- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,३८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२२,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३३ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

सीमांकन विधेयकासाठी केंद्राच्या पुन्हा हालचाली

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्याशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केंद्र सरकार लवकरच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू शकते. प्रस्तावित संशोधनातून मतदारसंघ पुनर्रचनेद्वारे लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून कमाल ८५० पर्यंत वाढविणे हा आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास संसद आणि राज्य विधिमंडळांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा होईल, असे केंद्र सरकारला वाटते.



केंद्र सरकारला विश्वास आहे की, त्यांच्याकडे आवश्यक संख्याबळ आहे. विधेयक १५ ते १८ मतांच्या अंतराने पारित होईल. मात्र, या सूत्रांनी प्रस्तावित सत्राच्या तारखा आणि कालावधी संदर्भात कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. घटना दुरुस्ती विधेयकाला पारित करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमाची गरज असते. ज्यासाठी ३६१ मतांची गरज आहे. ५४३ सदस्य असलेल्या लोकसभेत तीन जागा रिकाम्या आहेत. या प्रस्तावित दुरुस्ती अंतर्गत डिलिमिटेशनद्वारे लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवून ८५० करण्याचे ध्येय आहे. सरकारने घटना दुरुस्ती विधेयक १७ एप्रिल रोजी बजेट सत्रादरम्यान पारित करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु लोकसभेत आवश्यक संख्याबळ जमा करण्यात अपशय आल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. संसदेचे अधिवेशन कमी वेळाच्या नोटिशीवर बोलवण्याची शक्यता अजूनही कायम आहे. कारण आतापर्यंत औपचारिक रुपाने संसद तहकूब केलेली नाही.

मान्सून सत्राला १३ ऑगस्ट रोजी अनिश्चितकाळासाठी स्थगित केले होते. हे सत्र ९१ दिवसांपासून तहकूब केल्याशिवाय सुरूच आहे, ज्याने २००८ च्या ८७ दिवसांचा मागचा रेकॉर्ड तोडला आहे. सध्या सुरू असलेल्या सत्रात कोणत्याही बैठकीला बोलावण्यासाठी किमान २ दिवसांची नोटीस पुरेशी असते तर नवीन सत्राला बोलावण्यासाठी किमान १४ दिवसांची नोटीस द्यावी लागते. सरकारने पावसाळी अधिवेशन तहकूब न करण्याच्या निर्णयामुळे अधिवेशन वाढवले जाऊ शकते किंवा प्रस्तावित सुधारणांवर विचार करण्यासाठी विशेष बैठक बोलावली जाऊ शकते, अशा अटकळींना वाव मिळाला होता.

लोकसभेच्या जागा वाढविण्याचा घाट

सर्व राज्यांच्या लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्के वाढ केली जावी, म्हणजे दक्षिणेकडील राज्यांचा आक्षेप दूर केला जाईल. सरकार २०२९ च्या लोकसभा निवडणुकांच्या आधी महिला आरक्षण कायदा लागू करू इच्छीत आहे. गेल्या विधेयकाआधारे तयार केलेल्या नव्या मसुद्यात १९७१ च्या लोकसंख्या गणतीनुसार राज्यांच्या जागांचा कोटा कायम ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

काँग्रेसचा हल्लाबोल

संसदेच्या अधिवेशनावरून काँग्रेस आक्रमक झाली आहे. ९ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी म्हटले होते की, संसद अनिश्चितकाळासाठी स्थगित करण्याच्या प्रक्रियेला ८८ दिवस झाले आहेत, परंतु त्याचे सूप वाजलेले नाही. आज एक नवीन विक्रम झाला आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांना धोकादायक आणि विनाशकारी मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्यासाठी लोकसभेत कसे तरी संशयास्पद दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी हा विक्रम प्रस्थापित झाला आहे.आधी सर्वपक्षीय बैठक बोलवा

काँग्रेस अध्यक्षांनी गेल्या सहा महिन्यांत पंतप्रधानांना चार वेळा पत्र लिहून, मतदारसंघ पुनर्रचनेवर सर्व पक्षांची बैठक बोलावण्याची विनंती केली आहे, जेणेकरून कोणतेही विधेयक आणण्यापूर्वी सर्व प्रस्तावांवर पारदर्शकपणे आणि सविस्तरपणे चर्चा करता येईल. पंतप्रधानांनी तसे करण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे, असेही जयराम रमेश यांनी म्हटले.

थोडक्यात

केदारनाथ धामचे गर्भगृह बंद

रुद्रप्रयाग : उत्तराखंडमधील प्रसिद्ध केदारनाथ धामचे दरवाजे बुधवार भाऊबीजेच्या पवित्र पर्वावर हिवाळ्यासाठी बंद करण्यात आले. वैदिक मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींच्या वातावरणात सकाळी ८.३० वाजता मंदिराचे मुख्य दरवाजे पुढील सहा महिन्यांसाठी बंद करण्यात आले. या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी देश-विदेशातून लाखो भाविक केदारनाथ येथे दाखल झाले होते. धार्मिक मान्यतेनुसार, हिवाळ्यात केदारनाथ परिसरात मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी आणि कडाक्याची थंडी पडत असल्याने मंदिराचे दरवाजे बंद केले जातात. त्यानंतर बाबा केदारांची विग्रह उत्सव डोली त्यांच्या हिवाळी निवासस्थानी म्हणजेच उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील उखीमठ येथे नेण्यात येणार आहे. उखीमठ येथील मंदिरात पुढील सहा महिने बाबा केदारांची पूजाअर्चा आणि धार्मिक विधी पार पडतील. भाविकांनी तिथे दर्शनही घेता येईल. सोमेश्वर देवतेच्या नेतृत्वाखाली माता यमुनेची उत्सव पालखी खरसाली येथील खुशीमठात पोहोचेल. पुढील सहा महिने भाविकांना याच हिवाळी गादीस्थळांवर दर्शन घेता येईल. यावर्षी दोन्ही धाममध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक भाविक पोहोचले. मंगळवारी संध्याकाळपर्यंत केदारनाथ मध्ये १९ लाख १३ हजार आणि यमुनोत्रीमध्ये ८ लाख ८४ हजार भाविकांनी दर्शन घेतले आहे.

नेपाळमध्ये गाडी कोसळून १० ठार

काठमांडू : नेपाळच्या बागमती प्रांतात एक गाडी उतारावरून खाली कोसळून किमान १० जण ठार झाले आणि इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात मकवानपूर जिल्ह्यात पहाटे पावणे सहा वाजण्याच्या सुमारास घडला. माय रिपब्लिका वृत्तपत्राच्या मते, ही गाडी सुमारे १५ लोकांना घेऊन काठमांडूहून सलाहीकडे जात होते. ते तीव्र उतारावरून सुमारे ५०० मीटर खाली कोसळले, ज्यामुळे १० लोकांचा मृत्यू झाला आणि इतर पाच जण जखमी झाले. मृत लोकांमध्ये तीन महिला, दोन मुली आणि पाच पुरुषांचा समावेश असल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. जखमी झालेल्या लोकांना उपचारासाठी हेटौडा रुग्णालयात नेण्यात आले. अहमवालात पुढे म्हटले आहे की, अपघाताची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी सात सदस्यांचे बचाव पथक पाठवण्यात आले.



बेपत्ता दोन विशेष पोलिस अधिकाऱ्यांचे मृतदेह सापडले

किश्तवाड : जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात बेपत्ता झालेल्या दोन विशेष पोलिस अधिकाऱ्यांचे मृतदेह सापडले आहेत. त्यांच्या अंगावर गोळ्यांच्या अनेक खुणा आहेत. त्यांच्या असणारी शस्त्रेही घटनास्थळी सापडलेली नाहीत, त्यामुळे या कृत्यामागे दहशतवाद्यांचा हात असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मृत पोलिस कर्मचाऱ्यांची ओळख बाबी चंद (वय ५७) आणि रशपाल कुमार (वय ४५) अशी पटली आहे. हे दोघेही स्थानिक पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपचे सदस्य होते. सध्या त्यांची नियुक्ती दच्छन भागातील कियार गावात करण्यात आली होती. विशेष पोलिस अधिकारी बॉबी चंद आणि रशपाल कुमार बुधवारी किश्तवाड जिल्ह्यातील दुर्गम दच्छन परिसरातून बेपत्ता झाले होते. ते कियार गावातील आपल्या छवणीतून धर्ना-मरवाह येथील लष्करी चौकीच्या दिशेने निघाले होते, परंतु ते आपल्या नियोजित स्थळी पोहोचलेच नाहीत. दोन्ही पोलिस अधिकाऱ्यांचे मोबाईल फोनही बंद होते. स्थानिक रहिवाशांनी गोळीबाराचा आवाज ऐकल्याचे सांगितले. त्यानंतर, पोलिस आणि लष्कराच्या राष्ट्रीय रायफल्सने संयुक्तपणे मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू केली.



नागपूर-अमरावती मार्गावरील अनंततारा हॉटेलला आग, एका व्यक्तीचा मृत्यू, तीन जण जखमी

शॉर्ट सर्किटने आग लागल्याचा अंदाज, बाजारगाव येथील मुख्य मार्गावर असलेले नामांकित हॉटेल

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्यातील विविध शहरांमध्ये आग लागण्याच्या घटनांचं सत्र सुरुच आहे. राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये एका हॉटेलला आग लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील बाजारगाव येथील अनंततारा हॉटेलला भीषण आग लागली आहे. या आगीत एकाचा होरपळून मृत्यू झाला आहे तर तीन जखमी आहेत.

अनंततारा हॉटेलला शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची माहिती समोर आली आहे. या आगीमुळं एका व्यक्तीला जीव गमवावा लागला. मृत व्यक्तीचं नाव मनोज बांडे असं असल्याचे समोर आले आहे. मनोज बांडे हे अंजनगाव सुर्जीचे असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. अनंततारा हॉटेलला रात्री ८ वाजता आग लागली आहे. या हॉटेलमध्ये पहिल्या मजल्यावर थांबलेलेल्या मनोज बांडे या व्यक्तीचा आगीच्या धुरात गुदमरुन त्याचा मृत्यू झाला आहे. मनोज बांडे हे अंजनगाव सुर्जी तालुक्यात मंडळ अधिकारी पदावर कार्यरत असल्याची माहिती हॉटेलमधून मिळालेल्या ओळखपत्रावरुन स्पष्ट झाले आहे.

हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र हॉटेलमध्ये असलेली उपकरणं पुरेशी नव्हती. अग्निशमन दलाच्या चार गाड्या हॉटेल परिसरात दाखल झाल्या आणि त्यांच्याकडून लगेचच आग विझवण्यात आली. मात्र, या घटनेत एका व्यक्तीला जीव गमवावा लागला तर तीन जण जखमी आहेत.



मुख्यमंत्र्यांच्या शहरातच वैधमापनशास्त्र विभागाचा कारभार वाऱ्यावर!

पाच जिल्ह्यांच्या नियंत्रणासाठी कायमस्वरूपी अधिकारी नाही; ५०० किलोमीटर दूर संभाजीनगरातून नागपूरचा कारभार चालविण्याचा अजब प्रकार!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्राची उपराजधानी आणि राज्याचे मुख्यमंत्री यांचे शहर म्हणून ओळख असलेल्या नागपुरातच वैधमापनशास्त्र विभागाचा कारभार सध्या गंभीर प्रशासकीय प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडला आहे. नागपूर विभागातील पाच जिल्ह्यांच्या नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या महत्त्वाच्या विभागात कायमस्वरूपी सक्षम अधिकारी उपलब्ध नसल्याने परवानाधारक व्यावसायिक, व्यापारी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे नागपूर विभागाच्या सहनियंत्रकपदाचा प्रभारी कार्यभार ज्या अधिकाऱ्यांकडे देण्यात आला आहे, त्यांचा मूळ कार्यभार छत्रपती संभाजीनगर येथे असल्याचे सांगण्यात येते. नागपूर आणि संभाजीनगर यांच्यातील अंतर सुमारे ५०० किलोमीटर असताना एवढ्या मोठ्या भौगोलिक अंतरावरून नागपूर विभागाचा कारभार प्रभावीपणे कसा चालविला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जेव्हा की हाकेच्या अंतरावर अमरावती विभागाला स्थाई अधिकारी आहे, मग नागपूर येथे का नाही!

अनियंत्रित तराजू भाग-१

तक्रारदारांच्या तक्रारींचे काय ?

नागपूर विभागातील नागरिक, परवानाधारक आणि व्यावसायिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी तसेच तक्रारींच्या निवारणासाठी जबाबदार अधिकारी कार्यालयात उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी आहेत. अनेक तक्रारींचे निराकरण वेळेत होत नसल्याने तक्रारदारांना वारंवार कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत आहेत. काही तक्रारींचा पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने तक्रारी अक्षरशः केराच्या टोपलीत टाकल्या जात आहेत का, अनेक तक्रारी हेतुपुरस्सर गहाळ करण्यात आलेल्या आहेत असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

नागपूर ग्रामीणचा उपनियंत्रकपदाचा अतिरिक्त कार्यभारही चर्चेत!

याशिवाय नागपूर ग्रामीणचा उपनियंत्रकपदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याच्या निर्णयावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत आणि त्यांच्यावर असलेल्या तक्रारींबाबत गंभीर आक्षेप व्यक्त केले जात असताना त्यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी सोपविणे कितपत योग्य आहे, याची वरिष्ठ पातळीवर चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

निरीक्षकांच्या मनमानीवर नियंत्रण कोणाचे ?

वैधमापनशास्त्र विभागातील काही निरीक्षकांच्या कथित मनमानी कारभाराबाबतही परवानाधारक आणि व्यावसायिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. निरीक्षकांच्या कामकाजावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रभावी नियंत्रण आहे का? नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणारी सक्षम यंत्रणा अस्तित्वात आहे का? विभागात जबाबदारी निश्चित करणारी कोणतीही प्रभावी व्यवस्था आहे की नाही, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

वैधमापनशास्त्र विभाग हा व्यापारी, उत्पादक, वजनकाटा विक्रेते, दुरुस्ती व्यावसायिक तसेच सर्वसामान्य ग्राहकांच्या दैनंदिन व्यवहारांशी निगडित अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. अशा विभागातच अधिकारी नियमित उपलब्ध नसतील, तक्रारींचे निराकरण होत नसेल आणि निरीक्षकांच्या कामकाजावर नियंत्रण नसेल, तर सामान्य जनतेने न्याय मागायचा तरी कोणाकडे?

मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच प्रशासनाचा हा बोजवारा का ?

मुख्यमंत्री नागपूरचे असताना आणि नागपूरमधूनच पाच जिल्ह्यांचे प्रशासकीय नियंत्रण होत असताना वैधमापनशास्त्र विभागाला कायमस्वरूपी सहनियंत्रक आणि आवश्यक वरिष्ठ अधिकारी उपलब्ध करून देता येत नाहीत, ही बाब निश्चितच गंभीर आहे. राज्याच्या उपराजधानीतच एखाद्या महत्त्वाच्या विभागाचा कारभार प्रभारी व्यवस्थेवर अवलंबून राहणे हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

आता शासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज!

या संपूर्ण प्रकरणाची महाराष्ट्र शासनाने, वैधमापनशास्त्र विभागाच्या वरिष्ठ आयुक्तालयाने आणि संबंधित मंत्र्यांनी गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. नागपूर विभागाशी कायमस्वरूपी सहनियंत्रक व उपनियंत्रकांची नियुक्ती करावी, तक्रार निवारणासाठी नियमित अधिकारी उपलब्ध ठेवावेत, प्रलंबित तक्रारींचा आढावा घ्यावा आणि निरीक्षकांच्या कामकाजाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. नागपूरच्या जनतेला आणि परवानाधारकांना केवळ प्रभारी अधिकारी नकोत, तर प्रत्यक्ष काम करणारे, जबाबदारी स्वीकारणारे आणि तक्रारींचे निवारण करणारे अधिकारी हवे आहेत. आता मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी या प्रशासकीय अनागोंदीची दखल घेणार का, हा खरा प्रश्न आहे!



काँगोमध्ये रणांगणावरून पळ काढणाऱ्या ६६ सैनिकांना फाशीची शिक्षा

वालिकेल : आफ्रिकन देश असलेल्या काँगोमध्ये रणांगणावरून पळ काढल्याबद्दल आणि आदेशांचे पालन न केल्याबद्दल ६६ सैनिकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. उत्तर किवू प्रांतातील वालिकेल येथे एकूण ७१ सैनिकांवर लष्करी न्यायालयात खटला चालवण्यात आला होता. यापैकी ६६ जणांना फाशी, एकाला १० वर्षांचा तुरुंगवास, तर उर्वरित चार सैनिकांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २० ऑक्टोबर रोजी विद्रोही संघटना एफआरएन (ज्यामध्ये एम २३ बंडखोरांचाही समावेश आहे) यांच्यासोबत झालेल्या चकमकी दरम्यान हे सैनिक आपली पोस्ट सोडून पळून गेले होते. त्यांच्यावर भ्यादपणा, बंडखोरी आणि लष्करी आदेशांचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. काँगोचा पूर्व भाग ब-याच काळापासून एम २३ सारख्या विविध सशस्त्र विद्रोही गटांच्या हिंसाचाराचा सामना करत आहे. या बंडखोरांना शेजारील रवांडा देशाचा पाठिंबा असल्याचा आरोप काँगो सरकारकडून सातत्याने केला जातो.



सैन्यामध्ये शिस्त राखण्यासाठी आणि विद्रोही गटांविरोधातील मोहीम मजबूत करण्यासाठी ही कठोर कारवाई करण्यात आल्याचे लष्करने म्हटले आहे. काँगो सरकारने मार्च २०२४ मध्ये २० वर्षांपासून लागू असलेली मृत्युदंडावरील बंदी उठवली होती. देशद्रोह आणि युद्धगुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांवर वचक बसवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. फ्रान्सच्या आरएफआयच्या आकडेवारीनुसार, २०२५ च्या सुरुवातीपासून आतापर्यंत काँगोमध्ये विविध गुन्ह्यांसाठी ५०७ हून अधिक सैनिकांना दोषी ठरवण्यात आले असून त्यापैकी तब्बल ३८१ सैनिकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गेल्या महिन्यातही अग्निम मोर्च्यांवरून पळून गेल्याबद्दल २७ सैनिकांना फाशीची शिक्षा देण्यात आली होती.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

पुढाऱ्यांची दिवाळी जोमात, सर्वसामान्य कोमात!

गेल्या काही वर्षांपासून सणांचे स्वरूप पुढारी कमी कालावधीत करोडपती झाल्याचे दिसून येते.त्यामुळे त्यांचे वर्चस्व देशातील प्रत्येक राज्यात आपल्याला पहायला मिळते.परंतु याचे गंभीर परिणाम देशातील शेतकरी वर्ग,सुशिक्षित बेरोगार वर्ग, गरीब व सर्वसामान्य वर्ग यांना भोगावे लागत आहे.सध्या देशावर कोरड्या दुष्काळाचे गंभीर संकट ओढावले आहे. परंतु हा कोरडा दुष्काळ सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झालेली गंभीर समस्या आहे.राज्यासह देशात जी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे ती मानवजातीने ओढावलेली विनाशलिलाच म्हणावी लागेल.कारण मानवाने स्वतःच्या सुख-सुविधांसाठी राज्यासह देशात दरशेक लाखो वृक्षांची कत्तल होत आहे,मोठ्या प्रमाणात सिमेंटीकरण,औद्योगीकरण, शहरीकरण,अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे वातावरणात सर्वत्र बदल झाल्याचे दिसून येते आणि त्यांच्या गंभीर परिणामाला सुरूवात झाली आहे व यापुढे आणखी भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. देशातील कोरडा दुष्काळ हा नियोजनाच्या अभावामुळे व सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झालेली गंभीर समस्या असून सरकारने निसर्गाची राखरांगोळी केली व भयावह समस्या निर्माण केल्या आहेत व याचे प्रायश्चित्त शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना वेगवेगळ्या समस्यांच्या रूपात भोगाव्या लागणार आहे आणि भोगत आहेत.आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की,राजकीय पुढाऱ्यांची दिवाळी जोमात;परंतु दुष्काळामुळे व महागाईमुळे शेतकरी,गरीब,सर्वसामान्य कोमात असल्याचे सर्वत्र चित्र दिसत आहे.

देशातील दुष्काळाच्या अंधकारामुळे सणासुदीचा उत्साह जनुकाय हरविला की काय असे चित्र सर्वत्र दिसत आहे.दिवाळी सण म्हटला की,सर्वत्र झगमगाट,लहान-मोठे, आबालवृद्ध या सर्वांमध्ये आनंदाचे व खुशीचे वातावरण असते. परंतु यावर्षी कमी पावसामुळे आणि हवामान बदलामुळे सर्वत्र कोरड्या दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे.यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला असून याची झळ महागाईच्या रूपात गरीब व सर्वसामान्यांना भोगावी लागणार आहे व भोगत आहेत.सोबतच शेतीसाठी व सर्वसामान्यांना पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.सरकार मोठ्या प्रमाणात विकास काने करीत आहे यात तिळमात्र शंका नाही. परंतु विकासाचे योग्य नियोजन नसल्याने विकासाच्या नावाखाली सरकारने निसर्गाची अवहेलना करून हत्या केली आणि त्याचे प्रायश्चित्त आज राज्यासह देशातील लोकांना, पशुपक्ष्यांना व संपूर्ण जीव-जंतुंना भोगावे लागत आहे. सरकारने विकास कामे करतांना पुढे याचे काय गंभीर दुष्परिणाम होईल याचा सरकारने कदापि विचार केलेला नाही. त्यामुळे आज राज्यासह देशात दिवसेंदिवस गंभीर जल संकट, उष्णतेमध्ये वाढ आणि आरोग्यावर गंभीर परिणाम या नैसर्गिक समस्या निर्माण झाल्याने अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.आज सरकारने औद्योगीकरण, शहरीकरण, खनणन,सिमेंट रोड,उडान पुल अशाप्रकारे सर्वत्र सिमेंटीकरणाचे जाळे पसरवुन राज्यासह देशात विकासाचा सपाटा लावला खरा परंतु वृक्षांचा हिरवागार गालिचा नेस्तनाबूत केला आहे.राज्यासह देशात कोरडा दुष्काळ असुनही मोठ्या प्रमाणात सिमेंट कॉंक्रेटचे कामे आताही सुरूच आहे यामध्ये मुख्यत्वेकरून सरकारी आवास, बिल्डिंग्ज, भवन, नवीन एअरपोर्ट,विधानभवन इत्यादी अनेक कामे विकासाच्या नावाखाली सुरू असून यात सरकारने करोडो रुपयांची गुंतवणूक केली आहे.परंतु सरकार शेतकऱ्यांच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते व आर्थिक मदत करण्यास हिचकिचावत आहे.सरकारने शेतकऱ्यांना फक्त ५ हजार रुपये मदत करून तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. देशाच्या १४५ कोटी जनतेला व संपूर्ण जीवसृष्टीला ज्या निसर्गाची गरज आहे त्याकडे सरकार डोळे बंद करून पाठ फिरवितांना दिसते.आज सिमेंटीकरणाच्या दुष्पट वृक्षलागवड करणे गरजेचे होते.परंतु तसे काहीच दिसत नाही व संपूर्ण वृक्षारोपण फक्त कागदावर आणि राजकीय पुढारी वृक्षलागवडीच्या नावाखाली फोटो काढून फोटोसेशनवर भिडलेले असून मिडियावर हावी झाल्याचे दिसून येते.राजकीय पुढारी एक वृक्ष लावल्यानंतर त्याकडे ढुंकूनही पाहत नाही अशी गंभीर परिस्थिती सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी निर्माण करून ठेवली आहे आणि त्याचे प्रायश्चित्त शेतकरी,शेतमजूर व राज्यासह देशाची जनता दुष्काळाच्या रूपात भोगत आहेत तर सर्वसामान्य व गरीब माणूस महागाईच्या आगीत होरपळत आहे आणि निसर्गाचे आसू कोरडे झाले असून निसर्ग त्याकूळ झाला आहे व याची झळ पशुपक्षी आणि संपूर्ण जीवजंतू भोगत असुन त्यांच्यावर सुद्धा गंभीर संकट ओढवले आहे.

यामुळे मरावे की जगावे अशी सर्वांचीच गंभीर परिस्थिती झाली आहे.म्हणजे सरकारने निसर्गावर अत्याचार करून त्याकडे दुर्लक्ष केल्याने अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.सरकार विकासाच्या नावाखाली मोठमोठी सरकारी हॉस्पिटल तयार करीत आहे. परंतु निसर्गाची पायमल्ली करून बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेल्या आरोग्याच्या गंभीर समस्या याकडे सरकार दुर्लक्ष करतांना दिसते. शेतकरी दुष्काळाने होरपळत आहे आणि सरकार सरळ हातांनी मदत न करता समिती नेमून सरकार दीर्घकालीन उपाय शोधत आहे ही कसली मदत म्हणावी !आज जर सरकार १४५ कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरणाऱ्या शेतकऱ्यांना सरकार सरळ हातांनी मदत करीत नसेल तर या राजकीय पुढाऱ्यांचा काय फायदा? भारताला मोठा मान आहे तो म्हणजे भारत कृषीप्रधान देश आहे.परंतु आता सरकारने शेतकऱ्यांना हवालदिल केले असून कॉक्रीट प्रधान व राजकीय पुढारी प्रधान देश केल्याचे दिसून येते. आज शेतकऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आहे व मनाने श्रीमंत आहे;तरी तो आर्थिक दृष्ट्या शुन्य आहे असे का? याचा सरकारने कधीच गांभीयनि विचार केला नाही आणि करणार नाही. यामुळेच देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.शेतकरी श्रीमंत झाले तर राजकीय पुढाऱ्यांचे राजकारण नामशेष होईल.त्यामुळे सरकार व संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांना आपले बाहूले बनवून दाबून ठेवले आहे. आज शेतकरी राबराब राबतो तरीही त्यांच्या डोळ्यात अश्रूंच्या धारा दिसतात.कारण शेतात तो जेवढी मेहनत करतो त्याचा मोबदला नगन्य असतो. आज शेतातील माल निघतो दलालांच्या मार्फत बाजारपेठेत जातो.परंतु शेतकरी जो माल सरकारला किंवा दलालांना विकतात त्याचा मोबदला फक्त शंभर पैकी दहा टक्के मिळतो. त्यामुळे आपण पहातो व्यापारी,दलाल मोठ्या एकीने सोन्याची चैन,अंगठी घालून समाजात मिरवितो आणि त्याच ठिकाणी शेतकरी आपला सर्वसामान्यांसारखे जीवन जगतो.

दिवाळीतील अग्निदुर्घटना आणि फटाक्यांचा अतिरेक

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय संस्कृतीत दिवाळी हा मूळतः दिव्यांचा, प्रकाशाचा आणि मांगल्याचा उत्सव मानला जातो. अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवण्याचा संदेश देणारा हा सण गेल्या काही दशकांमध्ये मात्र आपल्या मूळ उद्देशापासून भरकटत चालला आहे. प्रकाशाची जागा आता कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाने आणि धुराने घेतली आहे. सण साजरा करण्याचा या बदललेल्या स्वरूपामुळे आणि फटाक्यांच्या अतिरेकी वापरामुळे हा उत्सव आता आनंदापेक्षा भीती, प्रदूषण आणि धोक्याचा अधिक बनत चालला आहे. संपूर्ण देशभरात आणि विशेषतः महाराष्ट्रात फटाक्यांमुळे लागणाऱ्या आगीच्या घटनांमध्ये अतिशय चिंताजनक वाढ झाली आहे. या वाढत्या अग्निदुर्घटना केवळ सार्वजनिक आणि खाजगी मालमत्तेचे अतोनात नुकसान करत नाहीत, तर अनेक निष्पाप नागरिकांच्या जिवावरही बेतत आहेत. शहरी भागातील दाट लोकवस्ती, गगनचुंबी इमारतींची वाढती संस्कृती आणि प्रशासकीय नियमांचे होणारे उल्लंघन या सर्व बाबींमुळे हवेत उडणारे फटाके किती विनाशकारी ठरू शकतात, याचे अत्यंत भयावह वास्तव नुकत्याच पार पडलेल्या सणानिमित्त पुन्हा एकदा रस्त्यावर निष्काळजीपणे फटाके फोडताना उडालेल्या ठिणग्या सुक्या कचऱ्याला, झाडांना किंवा आजूबाजूच्या वास्तूंना लागून या आगी भडकल्याचे तपासात स्पष्ट झाले.

आगीचे हे रौद्र तांडव केवळ पुण्यापुरते मर्यादित नव्हते. ७ नोव्हेंबर २०२६ आणि ८ नोव्हेंबर २०२६ या सलग २ दिवसांत राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात आगीच्या तब्बल ८९ घटनांची नोंद झाली, ज्यापैकी २८ आगी थेट फटाक्यांमुळे लागल्याचे अग्निशमन दलाच्या अहवालात उघड झाले. वाढत्या शहरीकरणात गगनचुंबी इमारतींमधील धोके किती मोठे आहेत, याचा प्रत्यय घाटकोपर परिसरातील १ घटनेतून आला. तेथील १ २१ मजली इमारतीत उडणारा रॉकेट फटाका थेट उघड्या खिडकीतून घरात शिरल्याने १९ व्या आग लागली; या मजल्यावर भीषण आग लागली; ज्यात ३ नागरिक गंभीर जखमी झाले. याच काळात ठाण्यातील वागळे इस्टेट येथील रहेजा गार्डन परिसरातील १ इमारतीत ८ व्या मजल्यावर लागलेली आग पाहता पाहता १४ व्या मजल्यापर्यंत भडकली. या थरारक घटनेत अग्निशमन दलाच्या जवानांनी जिवाची बाजी लावून तब्बल ५० नागरिकांची सुखरूप सुटका केली. या गंभीर प्रकारानंतर धोक्याची जाणीव होऊन ठाणे प्रशासनाला हवेत उडणाऱ्या रॉकेट फटाक्यांवर ९ नोव्हेंबर २०२६ रोजी तत्काळ बंदी घालण्याचे आदेश काढावे लागले.

राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्येही ७ ते ९ नोव्हेंबर २०२६ च्या दरम्यान या निष्काळजीपणाचा मोठा आर्थिक फटका बसला. ८ नोव्हेंबर २०२६ च्या रात्री नाशिकच्या कळवण परिसरातील १ होलसेल किराणा मालाच्या गोदामाला फटाक्याची ठिणगी लागून लागलेल्या आगीत अंदाजे ३,५०,००,००० रुपयांचा माल जळून खाक झाला. नागपूरच्या सावरकरनगरमध्ये दुचाकींच्या १ मोठ्या शोरूममध्ये आग लागून अनेक नव्या कोऱ्या गाड्या भस्मसात झाल्या. नवी मुंबईतील सीवूड्स, विरारमधील १ सोसायटी, धाराशिव जिल्ह्यातील उमरगा, सांगली आणि मिरज परिसरातील काही भाग, आणि संगमनेरसारख्या ठिकाणी घरे, दुकाने आणि जनावरांच्या गोठ्यांना आगी लागल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले. अनेक ठिकाणी कष्टकऱ्यांच्या वर्षभराच्या कमाईची राखरांगोळी झाली.

महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून देशातील इतर राज्यांमध्येही ८ नोव्हेंबर २०२६ च्या मध्यरात्री फटाक्यांच्या आतषबाजीने असेच भयानक नुकसान केले आहे. राजस्थानमधील पाली शहरात फटाक्यांच्या १ दुकानाला लागलेली आग इतकी रौद्र आणि अनियंत्रित होती की, त्यात १ स्थानिक नगरसेविका आणि त्यांच्या पतीचा अत्यंत दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना फटाक्यांच्या बेकायदेशीर साठवणुकीतील सुरक्षेच्या त्रुटींवर थेट प्रकाश टाकते. देशाची राजधानी दिल्लीला लागून असलेल्या गाझियाबादमधील विजयनगर औद्योगिक क्षेत्रात प्लास्टिकच्या खुर्च्या बनवणाऱ्या मोठ्या कारखान्याला आग लागल्याने प्रचंड प्रमाणात कच्चा माल जळून खाक झाला. वाय्यतिरिक्त जम्मू आणि काश्मीरमधील १ मोठे व्यावसायिक गोदाम, बिहारमधील पाटणा तसेच सिक्कीममध्येही कारखाना व भंगाराच्या दुकानांना आगी लागण्याच्या घटना देशभरातून नोंदवल्या गेल्या. बहुतांश ठिकाणी हवेत उडणारे फटाके अनपेक्षित दिशा बदलून खिडक्यांमधून आणि गॅलरीतून थेट घरांमध्ये किंवा औद्योगिक वसाहतींमध्ये शिरल्यानेच या दुर्घटना घडल्या आहेत.

मालमत्तेच्या आणि मानवी जिवाच्या या वाढत्या धोक्यासोबतच, या उत्सवामुळे होणारी पर्यावरणाची हानीदेखील अत्यंत भयावह पातळीवर पोहोचली आहे. ८ नोव्हेंबर २०२६ रोजी लाखो फटाके १ च वेळी फोडल्यामुळे निर्माण झालेल्या विषारी धुरामुळे पुण्याचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक संध्याकाळी ५ वाजता १६३ या समाधानकारक पातळीवरून रात्री ८ वाजेपर्यंत अतिशय वाईट आणि धोकादायक पातळीवर जाऊन पोहोचला. श्वास घेण्यास होणारा त्रास, डोळ्यांची जळजळ आणि ध्वनी प्रदूषणामुळे वृद्ध, लहान मुले आणि मुक्या प्राण्यांना सहन करावा लागणारा त्रास हा कोणत्याही आकडेवारीत मोजता न येणारा आहे. महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यावर बंदी घालूनही अनेक ठिकाणी अनधिकृत फटाका स्टॉल्स उभारून नियमांचे सरास आणि उघडपणे उल्लंघन करण्यात आले.

केवळ कागदोपत्री कायदे करून किंवा प्रशासकीय स्तरावर कोरड्या सूचना देऊन हा प्रश्न भविष्यात कधीही सुटणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाने आता गंभीर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. सणाच्या नावाखाली चाललेला हा जीवघेणा खेळ थांबवण्यासाठी नागरिकांनी स्वतःहून हवेत उडणाऱ्या फटाक्यांचा मोह कायमचा टाळणे आवश्यक आहे. फटाके फोडण्यासाठी केवळ सुरक्षित, मोकळ्या मैदानांचा वापर करणे आणि प्रशासनाने अनधिकृत फटाका विक्रीवर राजकीय दबाव झुगारून अत्यंत कठोर दंडात्मक कारवाई करणे ही आता काळाची नितांत गरज बनली आहे. समाजाची मानसिकता बदलली आणि सुरक्षेचे भान राखले गेले, तरच भविष्यात अशा विनाशकारी अग्निदुर्घटनांना कायमचा आळा घालता येईल आणि सणाचा मूळ सात्त्विक आनंद खऱ्या अर्थाने अबाधित राखता येईल.

- ९५६२५१४३०६

अंडर-१९ आशिया चषक की वय लपविण्याचा खेळ?

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

पाकिस्तानने भारताचीच नव्हे, तर जागतिक क्रिकेटची फसवणूक केली का ?

क्रिकेटच्या मैदानावर विजय मिळविण्यासाठी कौशल्य, गुणवत्ता, मेहनत आणि जिद्द लागते; परंतु प्रतिस्पर्ध्यांपेक्षा वयाने मोठे असूनही लहान वयोगटातील स्पर्धेत खेळण्याचा संशय निर्माण होत असेल, तर तो केवळ खेळाचा प्रश्न राहत नाही, तर क्रीडा नैतिकतेलाच लागलेला काळा डाग ठरतो ! सध्या ओमानमध्ये सुरू असलेल्या अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेतील पाकिस्तानच्या काही खेळाडूंच्या वयाबाबत उपस्थित झालेले प्रश्न त्यामुळेच गंभीर आहेत. पाकिस्तानने आपल्या संघात खरोखरच वयोमर्यादेपेक्षा मोठ्या खेळाडूंना खेळविले असेल, तर ही भारताचीच नव्हे, तर संपूर्ण जागतिक क्रिकेटची फसवणूक ठरेल.

अंडर-१९ क्रिकेटचा मूळ उद्देश उदयोन्मुख खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी देणे हा आहे. या वयोगटातील स्पर्धा म्हणजे भविष्यातील आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू घडविण्याची प्रयोगशाळा. येथे खेळाडूंच्या गुणवत्तेची, तंत्राची, मानसिक कणखरतेची आणि आंतरराष्ट्रीय आव्हाने पेलण्याच्या क्षमतेची परीक्षा होते. मात्र या स्पर्धेत वयाची मर्यादा पाळली गेली नाही, तर प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या पात्र युवा खेळाडूंवर अन्याय होतो. वयाने मोठ्या आणि शारीरिकदृष्ट्या अधिक विकसित खेळाडूंसमोर खऱ्या अर्थाने नवोदित खेळाडूंना उभे करणे म्हणजे समान संधीच्या तत्त्वाचीच पायमल्ली होय.

अली रझाच्या सहभागाने संशयाचे वादळ

नोव्हेंबर २०२६ मध्ये ओमान येथे सुरू असलेल्या अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात ८ नोव्हेंबरला झालेल्या सामन्यानंतर पाकिस्तानच्या खेळाडूंच्या वयाचा मुद्दा चर्चेत आला. विशेषतः वेगवान गोलंदाज अली रझाच्या सहभागाबाबत सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अली रझा याने गेल्या चार वर्षांत पाच महत्त्वाच्या अंडर-१९ स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याची माहिती समोर आली आहे. यात २०२४ चा अंडर-१९ विश्वचषक, २०२४ व २०२५ चे आशिया चषक, २०२६ चा अंडर-१९ विश्वचषक आणि सध्याचा आशिया चषक यांचा समावेश आहे. पाकिस्तानच्या युवा संघातील काही अन्य खेळाडूंच्या वारंवार सहभागावरही चर्चा सुरू आहे. भारताविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानच्या अंतिम अकरापैकी आठ खेळाडू मागील अंडर-१९ विश्वचषकात खेळले होते, अशी माहितीही प्रसिद्ध झाली आहे.

मात्र येथे एक महत्त्वाची बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे. उपलब्ध अधिकृत नोंदीनुसार अली रझाची जन्मतारीख १८ मार्च २००८ अशी असून, नोव्हेंबर २०२६ मध्ये तो १८ वर्षांचा आहे. त्यामुळे केवळ वारंवार अंडर-१९ स्पर्धा खेळल्याच्या आधारावर त्याला वयोमर्यादाबाहेरचा ठरविणे योग्य ठरणार नाही. त्याच्यावरील वयफसवणुकीचा आरोप सिद्ध झालेला नाही.

पण प्रश्न एवढाच आहे की, पाकिस्तानच्या खेळाडूंच्या वयाबाबत एवढी चर्चा का निर्माण होत आहे? या चर्चेला केवळ चाहत्यांची अतिशयोक्ती म्हणून बाजूला सारण्याऐवजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि आशियाई क्रिकेट परिषद यांनी पारदर्शक चौकशी करणे आवश्यक आहे.

पाकिस्तानला युवा क्रिकेटची मक्तेदारी हवी आहे काय ?

पाकिस्तान क्रिकेटमध्ये युवा खेळाडूंची कमतरता नाही. तेथील वेगवान गोलंदाजांची परंपरा, आक्रमक फलंदाजी आणि नैसर्गिक गुणवत्ता याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मग युवा क्रिकेटमध्ये स्वतःची ताकद सिद्ध करण्यासाठी वयाच्या पात्रतेबाबत संशय निर्माण होईल, अशी परिस्थिती का निर्माण व्हावी? पाकिस्तानच्या काही खेळाडूंनी पाकिस्तान सुपर लीगसारख्या व्यावसायिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. वरिष्ठ देशांतर्गत क्रिकेटचा अनुभवही काही खेळाडूंच्या गाठीशी आहे. अर्थात, वरिष्ठ स्तरावर खेळणे म्हणजे अंडर-१९ स्पर्धेसाठी अपात्र ठरणे नव्हे. परंतु अशा खेळाडूंच्या वयाची आणि पात्रतेची काटेकोर पडताळणी होणे आवश्यक आहे. युवा क्रिकेटमध्ये शारीरिक ताकदीचा मोठा प्रभाव असतो. १६-१७ वर्षांचा खेळाडू आणि १८-१९ वर्षांचा खेळाडू यांच्यात शारीरिक विकासाच्या दृष्टीने लक्षणीय अंतर असू शकते. अशा परिस्थितीत वयोमर्यादेचे उल्लंघन झाले, तर त्याचा थेट परिणाम सामन्याच्या निकालावर आणि पात्र खेळाडूंच्या भवितव्यावर होऊ शकतो.

आयसीसी आणि एसीसीने आता झोपेचे सोंग घेऊ नये !

या प्रकरणात सर्वांधिक जबाबदारी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) आणि आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) यांची आहे. वयाच्या पात्रतेबाबत नियम बनविणे पुरेसे नाही; त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक सहभागी देशाच्या खेळाडूंच्या जन्मतारखांची अधिकृत कागदपत्रे तपासली पाहिजेत. संशयास्पद प्रकरणांत नियमानुसार वैद्यकीय वय पडताळणी करावी. खेळाडूंच्या पात्रतेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास तिची निष्पक्ष चौकशी करून निष्कर्ष सार्वजनिक करावेत. पाकिस्तानच्या खेळाडूंवर सोशल मीडियावर आरोप होत असताना केवळ त्यांच्या अधिकृत जन्मतारखा नोंदविल्या आहेत म्हणून सर्व प्रश्न संपत नाहीत. त्याचप्रमाणे केवळ चेहरा, शरीरयष्टी किंवा गोलंदाजीचा वेग पाहून कोणालाही वय फसवणूक करणारा ठरविणेही अन्यायकारक आहे. सत्य शोधण्याची जबाबदारी अधिकृत यंत्रणांची आहे. जर एखाद्या खेळाडूने खोटी जन्मतारीख सादर करून स्पर्धेत सहभाग घेतल्याचे सिद्ध झाले, तर संबंधित खेळाडूवरच नव्हे, तर त्याला जाणीवपूर्वक संधी देणाऱ्या क्रिकेट मंडळावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. संघाची पात्रता, गुणतालिकेतील स्थान आणि मिळविलेल्या यशाबाबतही नियमांनुसार निर्णय झाला पाहिजे.

भारतासाठी हा केवळ पराभव-विजयाचा प्रश्न नाही!

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना म्हणजे केवळ दोन संघांमधील लढत नसते. त्याला प्रचंड लोकप्रियता, प्रतिष्ठा आणि भावनिक महत्त्व असते. मात्र भारताने पाकिस्तानला हरविले किंवा पाकिस्तानने भारताला पराभूत केले, एवढ्यापुरतेच या स्पर्धेचे मूल्यमापन होऊ नये. भारताच्या युवा खेळाडूंना भविष्यातील भारतीय क्रिकेटची जबाबदारी सांभाळायची आहे. त्यांना आपल्या वयोगटातील प्रतिस्पर्ध्यांशी खेळून अनुभव मिळवायचा आहे. त्यांच्या जागी वयाने अधिक मोठे खेळाडू उतरले, तर त्यांचा विकासाची संधी हिरावली जाऊ शकते. त्यामुळे हा प्रश्न भारतीय क्रिकेट नियामक मंडळानेही गांभीयनि घेतला पाहिजे. भारतीय क्रिकेटमध्ये वयातील गैरप्रकार रोखण्यासाठी २०१६ पासून बीसीसीआयने एका खेळाडूला दोन अंडर-१९ विश्वचषक खेळण्यावर निर्बंध घालण्यासारखे उपाय केले आहेत. अशा प्रकारच्या नियमांमागील उद्देशच नवोदितांना अधिक संधी मिळवून देणे हा आहे. पाकिस्तानेही आपल्या युवा क्रिकेटची विश्वासार्हता जपण्यासाठी अशाच प्रकारच्या पारदर्शकतेला प्राधान्य दिले पाहिजे.

क्रिकेटमध्ये विजय महत्त्वाचा; पण प्रामाणिकपणा त्याहून अधिक महत्त्वाचा!

क्रिकेट हा केवळ बॅट आणि बॉलचा खेळ नाही. तो शिस्त, प्रामाणिकपणा, खिलाडूवृत्ती आणि समान संधी यांचा संगम आहे. मैदानावर प्रतिस्पर्ध्याला पराभूत करणे हा खेळाचा उद्देश असला, तरी नियमांना हरवून मिळविलेला विजय कधीही अभिमानास्पद ठरू शकत नाही. पाकिस्तानने अंडर-१९ आशिया चषकात पात्र खेळाडूच उतरविले असतील, तर त्यांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही. उलट त्यांनी आपल्या खेळाडूंच्या वयाबाबतची अधिकृत कागदपत्रे आणि पात्रतेची पारदर्शक माहिती समोर आणावी. त्यामुळे संशयाचे निरसन होईल. परंतु कुठेही वयाची हेराफेरी झाली असेल, तर ती लपविण्याचा प्रयत्न म्हणजे क्रिकेटच्या प्रतिष्ठेशी केलेली प्रतारणा ठरेल. पाकिस्तान क्रिकेट मंडळाने लक्षात ठेवावे की, अंडर-१९ स्पर्धा म्हणजे वय लपवून अनुभवाचा फायदा घेण्याचे व्यासपीठ नाही! ही उद्याचे क्रिकेटपटू घडविण्याची संधी आहे. येथे वयाची चोरी करून मिळविलेला विजय म्हणजे क्रिकेटच्या भवितव्याची चोरी होय. आयसीसी आणि एसीसीने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जगासमोर आणले पाहिजे. दोष सिद्ध झाल्यास पाकिस्तानला कोणतीही सवलत न देता कठोर कारवाई करावी. कारण क्रिकेटमध्ये पाकिस्तान असो, भारत असो किंवा अन्य कोणताही देश, नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत.

पाकिस्तानला अंडर १९ आशिया चषक जिंकण्यासाठीच तर हा खटाटोप नाही ना ?

क्रिकेटला प्रतिभावान युवा खेळाडू हवे आहेत, वय लपविणारे अनुभवी खेळाडू नव्हेत! जागतिक क्रिकेटची विश्वासार्हता टिकवायची असेल, तर वयाच्या पात्रतेशी तडजोड करणाऱ्यांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखविण्याचे धाडस संबंधित संघटनांनी दाखविलेच पाहिजे!

दस्तुरखुद्द पाकिस्तानातीलच प्रसिद्धीमाध्यमे, यु ट्यूब चॅनेल्सवर माजी खेळाडू व तज्ञ खेळाडू आठ संशयीत खेळाडूंच्या नावांची चर्चा करत असून संशय स्पष्ट करणारी दुसरी घटना म्हणजे सदर संघातला वेगवान गोलंदाज अली रझाला उपांत्य फेरी पूर्वीच संघातून हटवून इमर्जिंग आशिया चषकाच्या पाक संघात स्थान दिले आहे. यावरून नेमके काय गौडबंगाल चाललंय हे लक्षात येत आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

जिल्ह्यातील ४ हजार शेतकऱ्यांना मिळणार सौर प्राणी प्रतिबंधक यंत्र

वन्यप्राण्यांच्या त्रासापासून पिकांचे संरक्षण, शेतकऱ्यांनी २० नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खनिज बाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या पिकांचे जंगली वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसान रोखण्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत प्रस्तावित योजनेतून जिल्ह्यातील चार हजार शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर सौर ऊर्जेवर चालणारे प्राणी प्रतिबंधक यंत्र उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिली.

प्राणी प्रतिबंधक यंत्रामुळे पिकांचे नुकसान टळणार

जिल्ह्यात भात, सोयाबीन, कापूस, तूर, गहू, हरभरा, भाजीपाला आणि फळपिके घेतली जातात. विशेषतः रात्रीच्या वेळी हरिण, नीलगाय, रानडुक्कर यांसारख्या वन्यप्राण्यांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यावर उपाय म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील अपारंपरिक ऊर्जा स्रोत व विद्युत



अभियांत्रिकी विभागाने हे विशेष यंत्र विकसित केले आहे. हे यंत्र पूर्णपणे सौर ऊर्जेवर चालणारे असून, सूर्यास्तानंतर स्वयंचलितपणे सुरू होते आणि सूर्योदयानंतर बंद होते. या यंत्रामधून प्रकाश व ध्वनीच्या माध्यमातून प्राण्यांना विनाप्राणघातक पद्धतीने शेतात प्रवेश करण्यापासून परावृत्त केले जाते. या एका यंत्राचा उपयोग अंदाजे २ हेक्टर क्षेत्रासाठी करता येतो.

योजनेची वैशिष्ट्ये

या योजने अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना यंत्राच्या किमतीवर ९० टक्के अनुदान देण्यात येणार असून प्रति लाभार्थी प्रस्तावित अनुदान सुमारे रु. नऊ हजार एवढे आहे. ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने दिली जाणार असून खनिज निधीच्या प्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील ७० टक्के आणि अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रातील ३० टक्के पात्र लाभार्थ्यांना याचा लाभ मिळेल.

२० नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करावे

पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित पद्धतीने आवश्यक कागदपत्रे जोडून दि.२० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आपले अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन नागपूरच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू यांनी केले आहे.

लाभार्थी निवडीच्या महत्त्वाच्या अटी

लाभार्थी नागपूर जिल्ह्यातील खनिज बाधित क्षेत्रातील पात्र गावातील शेतकरी असणे आवश्यक आहे. 'आत्मा' अंतर्गत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, महिला शेतकरी गट, सेंद्रिय शेती गट, शेतकरी स्वयंसहाय्यता संघ तसेच वन विभागांतर्गत पात्र शेतकरी गटातील सहभागी शेतकऱ्यांना लाभ दिला जाईल. लाभार्थी निवड "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वावर उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत केली जाईल. एका शेतकऱ्यास निकषानुसार केवळ एकच यंत्र दिले जाईल आणि ते स्वतःच्या शेतीच्या संरक्षणासाठी वापरणे बंधनकारक राहील.

थोडक्यात

....अखेर कोदामेंढी येथील मुख्य रस्ता झाला गुळगुळीत

भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष तथा तत्कालीन ग्रा पं कोदामेंढी सरपंच भगवान बावनकुळे यांच्या सतत पाठपुराव्याला यश,



कोदामेंढी परिसरातील वाहनधारक, विद्यार्थीवर्ग, रुग्ण, बँकेचे खातेदार व नागरिकांनी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार टेकचंद सावरकर यांचे मानले आभार

दे. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

मागील दहा वर्षांपूर्वीपासून कोदामेंढी येथील मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झालेली होती. कोदामेंढी येथे मुख्य बाजारपेठ, आठवडी बाजार, बैल बाजार,प्राथमिक आरोग्य केंद्र, राष्ट्रीयकृत बँक ऑफ इंडिया, जि प कनिष्ठ महाविद्यालय, दोन कॉन्व्हेंट असल्याने परिसरातील चाळीस गावांचे नागरिकांचे दररोज आवागमन असते. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील ठिकठिकाणी पडलेल्या असंख्य खड्डयांमुळे गावातीलच नव्हे तर परिसरातील वाहनधारकांसह, शाळा, कॉन्व्हेंट व महाविद्यालयात येणारे विद्यार्थीवर्ग, बँक शाखेत येणारे खातेदार, प्राथमिक आरोग्य केंद्रात येणारे रुग्ण कमालीचे त्रस्त होते. याबाबत तत्कालीन सरपंच तथा सध्याचे भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे यांनी सतत पाठपुरावा करून तत्कालीन आमदार टेकचंद सावरकर यांच्याकडून या मुख्य रस्त्यासाठी १ करोड रुपये तर महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून १ करोड १० लक्ष रुपये देत टप्पात या खडबडीत मुख्य रस्त्यासाठी मंजूर होऊन कामही नुकतेच पूर्णत्वास होऊन आवागमन सुरू झाल्याने अखेर कोदामेंढी येथील मुख्य रस्ता गुळगुळीत झालेला आहे.

दिवाळी पंचमी निमित्त दरवर्षी पाहुण्यांचे आगमन याच खडबडीत रस्त्याने होत होते. मात्र यंदा पंचमी निमित्त १४ व १५ नोव्हेंबरला दोन दिवसीय मंडई उत्सवाला येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत गुळगुळीत रस्त्याने होणार असल्याने व काही पाहुण्यांचे आगमन झालेले असून, त्या पाहुण्यांनी, गावातील व परिसरातील विद्यार्थी वर्ग, रुग्ण, बँकेचे खातेदार, वाहनधारक यांनी कोदामेंढी येथील मुख्य रस्ता गुळगुळीत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणाऱ्या महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार टेकचंद सावरकर सह या रस्त्यासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी सतत पाठपुरावा करणारे तत्कालीन सरपंच तथा भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे यांचे आभार मानले आहे.

मंजूर ५३६, बियाणे मिळाले केवळ २८९ जणांनाच!

२५७ पात्र शेतकरी अनुदानित हरभरा बियाण्यापासून वंचित; कृषी विभागाच्या नियोजनाचा बोजवारा, अतिरिक्त बियाण्याची मागणी

दे. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाच्या अनुदानित बियाण्याचाही लाभ मिळत नसेल, तर या योजनांचा उपयोग काय? भिवापूर तालुक्यातील हरभरा बियाणे वाटपाचा घोळ पाहता हाच प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाने ५३६ शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड केली; मात्र प्रत्यक्षात केवळ २८९ शेतकऱ्यांच्याच हातात बियाणे पडले. उर्वरित २५७ पात्र शेतकरी बियाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. निवड झाली, मंजुरी मिळाली; पण बियाणेच मिळाले नाही, अशी विचित्र अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन रब्बी हंगामासाठी



शासनाने सातबारा उताऱ्याच्या आधारे ऑनलाइन अर्ज मागविले. त्यानंतर लॉटरी पद्धतीने ५३६ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. मात्र, महाबीजकडून केवळ २८९ शेतकऱ्यांनाच अनुदानित हरभरा बियाण्याचे वाटप करण्यात आले. उर्वरित शेतकऱ्यांना लक्षांक संपल्याचे कारण पुढे करून बियाण्यापासून दूर ठेवण्यात आले आहे. मग लाभार्थ्यांची निवड करताना बियाण्याची उपलब्धता तपासली नव्हती का, असा सवाल उपस्थित होत आहे.

रब्बी पेरणीचा हंगाम सुरू असताना बियाण्याची प्रतीक्षा करणे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक ठरू शकते. एकीकडे दुष्काळातून सावरण्यासाठी शासन अनुदानाच्या योजना जाहीर करते, तर दुसरीकडे निवड झालेल्या शेतकऱ्यांनाच लाभ मिळत नाही. ही केवळ प्रशासकीय विसंगती नसून शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये भर घालणारी बाब आहे.

या प्रकाराविरोधात भिवापूर तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. समितीच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल, कृषी आयुक्त, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

तालुक्यासाठी अतिरिक्त निधी आणि बियाण्याचे उद्दिष्ट मंजूर करून उर्वरित २५७ पात्र शेतकऱ्यांना तातडीने महाबीजचे अनुदानित हरभरा बियाणे उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी समितीचे सभापती भास्कर येंगोले यांनी केली आहे. आता शासन मंजूर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ केव्हा की शेतकऱ्यांना लक्षांकाच्या नावाखाली वाऱ्यावर सोडणार, हा खरा प्रश्न आहे.

नागपुरात शनिवार १४ नोव्हेंबर रोजी रंगणार जादुई आवाजाची सुरेल मैफिल

सुप्रसिद्ध गायक पवनदीप राजन अन् गायिका चेतना भारद्वाज यांची विशेष उपस्थिती, मनपा 'गरोबा महोत्सव अंतर्गत' संगीत संध्या कार्यक्रमाचे आयोजन

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर नागपूर महानगरपालिकेद्वारा गरोबा महोत्सवांतर्गत संगीत संध्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सरदार वल्लभ भाई पटेल कच्चीविसा मैदान लकडगंज येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक इंडियन आयडल फेम पवनदीप राजन आणि गायिका चेतना भारद्वाज यांच्या जादुई आवाजाची सुरेल मैफिल रंगणार आहे. हा संपूर्ण कार्यक्रम निःशुल्क असून, नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन महापौर निता ठाकरे आणि कार्यक्रमाचे संयोजक तथा सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी केले आहे.



कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर निता ठाकरे राहणार असून, या याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, राज्यसभा सदस्य माया इवनाते, विधान परिषद आमदार अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहे.

नागपुरात १३ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय परफॉर्मिंग आर्ट्स फेस्टिव्हल, शास्त्रीय संगीताचे आयोजन

मोहिनीयाट्टम आणि कथ्थक नृत्याची रंगतदार मेजवानी

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

इंटरनॅशनल परफॉर्मिंग आर्ट्स फेस्टिव्हलचा नववा नागपूर महोत्सव शुक्रवार, १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सार्वजनिक हॉल, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. सामाजिक उद्योजक तथा IPAF चे संचालक श्याम पांडे यांच्या पुढाकारातून २३ जुलै २०१५ रोजी अहमदाबाद येथे या महोत्सवाची सुरुवात झाली. भारतीय पारंपरिक कला, संस्कृती आणि लोककलांचे जतन व संवर्धन करण्यासोबतच नवोदित आणि प्रस्थापित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. आतापर्यंत देशभरात २५० हून अधिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाच्या महोत्सवात प्रसिद्ध तबलावादक, ग्रॅमी ज्युरी सदस्य आणि पद्मश्री मातरम्चे राष्ट्रीय संचालक पं. प्रद्युत मुखर्जी यांचे 'रिदम टॉक' हे विशेष संगीत सादरीकरण आकर्षण ठरणार आहे. तसेच प्रसिद्ध शास्त्रीय नृत्यांगना कलामंडलम स्वर्णदीपा महंता मोहिनीयाट्टम सादर करणार असून, संस्कार केंद्राच्या कलाकारांकडून कथ्थक नृत्याचे सादरीकरण होणार आहे. भारतीय शास्त्रीय आणि समकालीन कलाप्रकारांचा संगम घडविणारा हा महोत्सव रसिकांसाठी सांस्कृतिक पर्वणी ठरणार असून, कलाकार, कलाप्रेमी, मान्यवर आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

जीवनविकास एज्युकेशन सोसायटी सेवकांची सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी व नवनिवाहित सभासदांच्या पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जीवनविकास एज्युकेशन सोसायटी सेवकांची सहकारी पतसंस्था, सक्करदरा, नागपूरची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थेचे संचालक तथा शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र झाडे आणि संचालक नितीन झाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी देवेंद्र काळबांडे होते. सभेच्या प्रारंभी संस्थेचे नुकतेच निधन झालेले संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी बाबुरावजी झाडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे स्मरण करण्यात आले.



सभेत मागील सभेचा इतिवृत्तांत, आर्थिक पत्रके, वार्षिक प्रगती अहवाल, लाभांश मंजुरी तसेच आगामी वर्षाच्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यानंतर सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दिली. याप्रसंगी संस्थेतील सेवानिवृत्त शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

यामध्ये प्रवीण बाबुराव झाडे, अनिता उईके, सतीश माटे, रामचंद्र ठाकरे, नेहा मेहर, शोभा शेरकर आणि तुलसीदास मोहनकर यांचा समावेश होता. तसेच चालू सहकार वर्षात विवाहबद्ध झालेल्या सभासदांच्या मुला-मुलींचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या भावी वैवाहिक जीवनासाठी उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. याशिवाय सभासदांच्या ज्या पाल्यांनी इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केले, अशा गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन प्रोत्साहित करण्यात आले. सभेचे संचालन संस्थेचे मानद सचिव बळवंत मोरघडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. देवमन कामडी यांनी मानले. शेवटी प्रमुख अतिथी व सभाध्यक्षांच्या मार्गदर्शनानंतर सभेची सांगता

खात येथे भाऊबीज निमित्त आयोजित मंडई उत्साहात संपन्न



दे. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

खात गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही भाऊबीज निमित्त आयोजित पारंपरिक मंडईचे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या मंडईचे मुख्य आकर्षण म्हणजे भव्य कुस्ती दंगल.या कुस्ती दंगलीमध्ये विविध गावांतील पैलवान बंधूंनी सहभाग नोंदवून आपले उत्कृष्ट कुस्ती कौशल्य आणि खेळातील जिद्द दाखवून दिली. विजयी पैलवानांना विविध पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी आयोजक मंडळी, गावकरी तसेच बाहेरगावाहून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा पारंपरिक मंडई आणि कुस्ती स्पर्धांमुळे गावातील एकोपा, बंधुभाव आणि ग्रामीण संस्कृतीचे जतन होते. याप्रसंगी माजी भाजपा मौदा तालुकाध्यक्ष तथा माजी पंचायत समिती सदस्य मुकेश अग्रवाल,माजी सरपंच कैलास वैद्य, उपसरपंच रवींद्र मंडारकर, माजी पंचायत समिती सभापती राजकुमार ठवकर, स्वप्निल श्रावणकर, सरपंच आदासा संजय आतीलकर, सरपंच पिपरी (खंडाळा) रमेश चरडे,अरोली ठाणेदार सागर गोमासे, भाजपा अध्यक्ष खात गुड्डू गिरीपुंजे, ग्राम पंचायत सदस्य राकेश बागडे, अरविंद तांबूलकर,शैलेश गिरीपुंजे, बाहेरगावाहून आलेली पाहुणे मंडळी आणि गावातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

---

१४ नोव्हेंबरपासून सार्वजनिक वाचनालयात व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम

दे. सिंहवाणी वृत्त, भंडारा : डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त सार्वजनिक वाचनालय भंडाराच्यावतीने १४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत दररोज सायंकाळी ६ वाजता इंद्रराज सभागृह सार्वजनिक वाचनालय भंडारा येथे विविध विषयांवर व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेत १४ नोव्हेंबरला 'मुलांचे भावविश्व' या विषयावर सौ. प्रतिभा घुले यांचे व्याख्यान होईल.१५ नोव्हेंबरला 'मज हृदयी सदुरु'यावर डॉ. विवेक पत्की यांचे, १६ नोव्हेंबरला 'कृत्रिम प्रज्ञा आणि भाषा' या विषयावर डॉ. अमोल पदवाड नागपूर यांचे १७ नोव्हेंबरला 'योग: कर्मसु:कौशल्यम्'यावर योगाचार्य श्याम कुकडे यांचे तर १८ नोव्हेंबरला 'कृत्रिम बुद्धिमत्ता: प्रभाव आणि परिणाम'यावर प्रा. डॉ.प्रशांत माणुसमारे यांचे,१९ नोव्हेंबरला 'धम्मदेशणा' याविषयावर भिक्षुणी विजया मैत्रेय, हेमाताई गजभिये यांचे व्याख्यान होईल.

२० नोव्हेंबरला विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत 'दशावतार नृत्यनाट्य' नूपुर नाट्य निकेतन भंडारा व्दारा सादर केले जाईल.या व्याख्यानमालेला तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाला भंडारा शहरातील नागरिक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी,वाचक आणि विचारवंतांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक वाचनालय भंडाराचे अध्यक्ष धनंजय दलाल,कार्यवाह प्रा.सुमन्त देशपांडे तसेच कार्यकारी मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

स्मार्ट टीओडी मीटरचा करिष्मा! नागपूर परिमंडळातील घरगुती वीज ग्राहकांची सात महिन्यांत तब्बल १० कोटी ३७ लाखांची बचत

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वाढत्या महागाईच्या काळात नागपूर आणि वर्धानिवासीयांना दिलासा मिळाला आहे. महावितरणच्या 'स्मार्ट टीओडी' मीटरमुळे या दोन्ही जिल्ह्यातील घरगुती वीज ग्राहकांनी गेल्या अवघ्या सात महिन्यांत आपल्या वीज बिलात तब्बल १० कोटी ३७ लाख ७ हजार ५६५ रुपयांची घसघशीत बचत केली आहे. दिवसा वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी हे तंत्रज्ञान आता खऱ्या अर्थाने 'वरदान' ठरत आहे,

सध्या सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या स्मार्ट मीटरधारकांना प्रति युनिट तब्बल ८५ पैशांची थेट सवलत मिळत आहे. या योजनेमुळे एप्रिल ते ऑक्टोबर २०२६ या सात महिन्यांच्या काळात नागपूर जिल्ह्यातील ग्राहकांनी ८ कोटी ८५ लाख ९९ हजार ५४९ रुपये, तर वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांनी १ कोटी ५१ लाख ८ हजार १५ रुपयांची बचत केली आहे. विशेष म्हणजे, या सवलतीचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांची संख्या दरमहा सातत्याने वाढत असून, ऑक्टोबर महिन्यात ५ लाख १ हजार ५७२ ग्राहकांनी तब्बल १ कोटी ४३ लाख ७० हजार २७३ रुपयांची सवलत मिळवली आहे.

सौर ऊर्जेचा प्रभावी वापर आणि पारदर्शकता: या संपूर्ण यशाच्या मुळाशी दिवसा उपलब्ध होणारी स्वस्त सौर ऊर्जा आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार मिळणारी ही ८५ पैशांची सवलत नजीकच्या काळात १ रुपया प्रति युनिटपर्यंत वाढणार आहे. मात्र, या फायद्याचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांच्या घरी स्मार्ट टीओडी मीटर असणे आवश्यक आहे. महावितरणने या मोहिमेत पूर्ण पारदर्शकता ठेवत आधी स्वतःच्या कार्यालयांतून आणि कर्मचारी वसाहतींमधून या मीटरची यशस्वी अंमलबजावणी केली आहे.

महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे आता ग्राहक आपल्या वीज वापराचा ह्यरिअल टाईमह्ण डेटा पाहू शकतात. दर तासाला किंवा दिवसाला किती वीज खर्च झाली, याची अचूक माहिती हातात उपलब्ध असल्याने ग्राहकांना स्वतःच्या वीज वापराचे नियोजन करणे अत्यंत सोपे झाले आहे.

अफवांना पूर्णविराम; मीटर बसवणे पूर्णतः मोफतः काही भागांत या स्मार्ट मीटरबाबत जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून विरोध दर्शविण्याचा प्रयत्न झाला होता; परंतु या मीटरमुळे होणारे प्रत्यक्ष आर्थिक लाभ समोर आल्यानंतर हा विरोध आता पूर्णपणे मावळला आहे. याविषयी बोलताना नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी ग्राहकांना वस्तुस्थिती समजून घेण्याचे आवाहन केले आहे.

ते म्हणाले, "हे स्मार्ट मीटर बसवण्यासाठी महावितरण कडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्णतः मोफत आहे. या मीटरमुळे बिल वाढते हा दावा पूर्णपणे निराधार असून, वापुळे केवळ वीज वापराचे अधिक अचूक वाचन मिळते."

सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या अफवांना न जुमानता आणि कोणत्याही गैरसमजाला बळी न पडता, वीज बिलात घसघशीत सवलत मिळवण्यासाठी ग्राहकांनी स्मार्ट मीटरच्या या लोकउपयोगी प्रवासात महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

थोडक्यात

सरपंच संकेत झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गांगनेर- खंडाळा गावादरम्यान असलेल्या पुलावर बनविला ताडपत्री बंधारा

आर्ट ऑफ लिविंग या सामाजिक संस्थेची ताडपत्री बंधारे बनवण्याची वाट न पाहता खंडाळा (गांगणेर) येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत पुढाकार



दै.सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा

श्री श्री रविशंकर आर्ट ऑफ लिविंग या सामाजिक संस्थेतर्फे उन्हाळ्यात पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींच्या पाण्याची पातळी खूप खोल जाऊ नये, नागरिकांसह,गुराढोरांना पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध व्हावा यासाठी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक विधानसभा क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या पारशिवनी, रामटेक व मौदा तालुक्यातील गावागावातून वाहणाऱ्या नाल्यांवर ताडपत्री बंधारे बनवण्याच्या उपक्रम युद्ध स्तरावर सुरू आहे. मात्र आज बुधवार (ता.११ नोव्हेंबर)ला ग्रामपंचायत खंडाळा (गांगणेर) येथील सरपंच संकेत झाडे, सचिव श्रद्धा सपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायत कर्मचारी सतीश वाघमारे यांच्या देखरेख अंतर्गत गावातील शेतकरी एकत्र येऊन सर्वांच्या सहकार्याने खंडाळा-गांगणेर गावादरम्यान असलेल्या पुलावर ताडपत्री बंधारा बांधला. शासकीय यंत्रणेची व सामाजिक संस्थेची वाट न पाहता गावातील नागरिक,शेतकरी एकत्र येऊन सर्वांनी सहकार्य केल्यास त्यांच्या समस्या त्या स्वतः विना विलंब सोडवू शकतात हा संदेश खंडाळा (गांगणेर) येथील यशस्वीरित्या बनविलेल्या ताडपत्री बंधाऱ्यातून परिसरात, तालुक्यात, जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही जाईल व त्याचे अनुकरण परिसरातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील व राज्यातील नागरिक व शेतकरी निश्चितच करतील, अशी भावना पुलावर उभा असलेल्या एका सामाजिक कार्यकर्त्याने नाव न प्रकाशित करण्याच्या अटीवर बोलून दाखवली.

काचुरवाहीत राष्ट्रीय दुय्यम खडा तमाशाचा रंगला सामना




दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही-शुभम कामळे

रामटेक तालुक्यातील काचुरवाही येथे भाऊबीज उत्सवानिमित्त १२ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय दुय्यम खडा तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध शाहीर जयाताई बोरकर विरुद्ध शाहीर आर्यन नागदेवे यांच्यात रंगलेला खडा तमाशाचा सामना हे विशेष आकर्षण ठरले. भाऊबीज उत्सव आणि गावातील मंडई महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमामुळे काचुरवाही परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक लोककलेचा वारसा जपणाऱ्या खडा तमाशाच्या कार्यक्रमाला नागरिक, युवक तसेच परिसरातील कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

शाहीर जयाताई बोरकर आणि शाहीर आर्यन नागदेवे यांच्या सवाल-जवाबाच्या जुगलबंदीमुळे कार्यक्रमात रंगत निर्माण झाली. पारंपरिक खडा तमाशातील सवाल-जवाब, गायन, विनोद आणि लोककलेच्या विविध सादरीकरणातून कलाकारांनी रसिकांचे मनोरंजन केले. दोन्ही शाहिरांच्या कलाविष्कारामुळे उपस्थित प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेचा आनंद अनुभवता आला.

अरोली येथे अपंगांना आनंदाच्या शिधाचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यावर्षी अपंगांची दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवाळीचा आनंदाचा शिधा अपंग लोकांना भेट स्वरूपात दिला. त्या कीटचे वाटप शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत भुरे यांच्या नेतृत्वातील चमुने अरोली येथील अपंग बांधवांच्या घरोघरी जाऊ वाटप केले. या प्रसंगी अपंग लोकांना खूप आनंद झाला व त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल तसेच गावातील लोकप्रतिनिधी यांचे खूप आभार मानले. अपंग लोकांच्या चेहऱ्यावरचे आनंद बघून कीट वाटणाऱ्या चमूला समाधान वाटले. यावेळी चमूच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व अपंगांना तसेच गावकऱ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी किट वाटणाऱ्या चमूमध्ये तालुका शिवसेनाप्रमुख प्रशांत भुरे, सरपंचा रोशनी प्रशांत भुरे, माजी उपसरपंच कैलास समरीत, ग्रा पं सदस्य विकास समरीत, निलेश डहारे, सामाजिक कार्यकर्ते गणेश बावनकुळे, शुभम मेहर सह गावातील इतरही सामाजिक कार्यकर्त्यांच्या मोठ्या संख्येने समावेश होता.

विशेष लोक अदालत २१ नोव्हेंबर रोजी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने २१ नोव्हेंबर रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सलमान एम. आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील हजारो न्यायालयीन प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. सर्व संबंधित पक्षकारांनी लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश प्रविण उन्हाळे यांनी केले.

रस्ते अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी करा!

हेल्मेट व सीटबेल्टशिवाय प्रवेश नाही, 'हेल्मेट नाही तर पेट्रोल नाही', धोरण राबविण्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष अभय सप्रे यांचे निर्देश



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

देशात दरवर्षी सुमारे पाच लाख रस्ते अपघात होतात. त्यामध्ये सुमारे दोन लाख व्यक्तींना जीव गमवावा लागतो. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय सप्रे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे नागपूर जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची आढावा बैठक माजी न्यायमूर्ती अभय सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार, पोलीस उपायुक्त (वाहतूक) आदित्य मिरखेलकर, महानगर पालिकेच्या मुख्य अभियंता लीना उपाध्ये तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना सप्रे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाने रस्ते अपघात रोखण्यासाठी विविध धोरणे निश्चित केली आहेत. त्यानुसार जिल्ह्यात शून्य अपघाताचे उद्दिष्ट ठेवून काम करणे आवश्यक आहे. भारताच्या तुलनेत जपानमध्ये अपघातांचे प्रमाण असले, तरी अपघातांमधील मृत्यूंचे प्रमाण तुलनेने कमी आहे. त्याच धर्तीवर नागपूर जिल्ह्यात अपघातांमधील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

हेल्मेट आणि सीटबेल्टचा वापर अनिवार्य करण्यासाठी सर्व शासकीय विभाग, उद्योग समूह आणि शैक्षणिक संस्थांना स्पष्ट सूचना द्याव्यात. हेल्मेट व सीटबेल्टशिवाय प्रवेश दिला जाणार नाही, अशी अंमलबजावणी करावी. तसेच 'हेल्मेट नाही तर पेट्रोल नाही' यासारख्या उपाययोजनांचाही विचार करावा. केवळ नियम करून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि व्यापक जनजागृती करणे गरजेचे आहे. अपघातात कोणत्याही निष्पाप व्यक्तीचा जीव जाणार नाही, यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष राहावे. या उपाययोजनांबाबत तातडीने कार्यवाही करून येत्या डिसेंबरपर्यंत अहवाल सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.

देशातील अपघातप्रवण १०० जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यांचा समावेश असून त्यात नागपूर जिल्ह्याचाही समावेश आहे. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात अपघातांचे प्रमाण अधिक असल्याचे बैठकीत निदर्शनास आले. शिक्षण, वाहतूक आणि इतर संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून जनजागृती केल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते, असे सप्रे यांनी नमूद केले.

अपघात घडल्यानंतर जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्य विभागाने अपघातग्रस्तांना जवळच्या रुग्णालयात त्वरित दाखल करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. अपघातामुळे केवळ एका व्यक्तीचे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे नुकसान होते. त्यामुळे अपघात प्रतिबंधाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

हेल्मेट व सीटबेल्ट वापराची सक्ती करण्यासोबतच व्यापक जनजागृती करावी, सुरक्षित प्रवासासाठी विविध उपाययोजना राबवाव्यात आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. अपघातांच्या प्रमुख कारणांमध्ये अरुंद रस्ते, जड वाहनांची वर्दळ, चुकीच्या पद्धतीने वाहन चालविणे तसेच रस्त्यांवरील पथदिव्यांचा अभाव यांचा समावेश सादरीकरणाद्वारे सांगण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक व पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांनी शहरात सुमारे तीन हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याची माहिती दिली. शहरात राबविण्यात आलेल्या उपाययोजना आणि जनजागृतीमुळे अपघात व मृत्यूंच्या प्रमाणात घट झाल्याचेही दिली. बैठकीत शहर व ग्रामीण भागातील माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

विशाल कोरके यांची शिवसेनेच्या नागपूर शहर प्रमुखपदी नियुक्ती

शाखा प्रमुख ते शहर प्रमुख, विशाल कोरके यांचा प्रेरणादायी राजकीय प्रवास, निष्ठा, संघटन कौशल्य आणि सामाजिक कार्याच्या बळावर नागपूर शहर प्रमुखपदाची जबाबदारी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आशीर्वादाने, तसेच पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव आणि संपर्कप्रमुख संजय निरुपम यांच्या मार्गदर्शनाखाली विशाल कोरके यांची शिवसेनेच्या नागपूर शहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शाखा प्रमुख म्हणून राजकीय प्रवासाला सुरुवात करून शहर प्रमुखपदापर्यंत मजल मारणारा त्यांचा प्रवास शिवसैनिकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारा आहे.

सामान्य शिवसैनिक म्हणून पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत विशाल कोरके यांनी टप्प्याटप्प्याने संघटनेत आपले स्थान निर्माण केले. शाखा प्रमुख म्हणून काम करताना त्यांनी पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच



कार्यकर्त्यांचे संघटन, नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनतेशी नाते दृढ करण्यावर भर दिला. पक्षाप्रती असलेली निष्ठा, सातत्यपूर्ण कार्य आणि संघटन कौशल्याच्या जोरावर त्यांनी आज शहर प्रमुखपदापर्यंतचा प्रवास पूर्ण केला आहे. राजकीय कार्यासोबतच सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातही विशाल कोरके नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, विविध क्रीडा स्पर्धा, शिव मॅरेथॉन, गणेशोत्सव, युवक मेळावे आदी विविध उपक्रमांचे आयोजन करून त्यांनी युवकांना सामाजिक कार्याशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचा नागरिकांशी सातत्याने संपर्क राहिला असून, समाजातील विविध घटकांमध्ये त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

शहर प्रमुखपदी नियुक्ती झाल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना विशाल कोरके म्हणाले, "माझ्या शहर प्रमुखपदी झालेल्या निवडीबद्दल सर्वांनी दिलेल्या प्रेमळ शुभेच्छा आणि आशीर्वादाबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. आपण दाखविलेला विश्वास आणि दिलेले प्रेम हीच माझी पुढील वाटचालीसाठी प्रेरणाशक्ती आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण घराघरात पोहोचविण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. पक्ष संघटना अधिक मजबूत करणे, सामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे आणि शिवसैनिकांना सोबत घेऊन पक्षाचा विस्तार करणे हे माझे प्रमुख उद्दिष्ट राहील." या नियुक्तीबद्दल विशाल कोरके यांनी पूर्व विदर्भ संघटक किरणजी पांडव, संपर्कप्रमुख संजयजी निरुपम तसेच आमदार कृपाल तुमाने यांचे विशेष आभार मानले.

शाखा प्रमुखापासून शहर प्रमुखपदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा पक्षनिष्ठा, मेहनत आणि संघटनात्मक कार्याची पावती मानला जात आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे नागपूर शहरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

दोडामार्गच्या सिताराम राऊळ यांची जागतिक स्तरावर भरारी!

लंडनमध्ये वन्यजीव छायाचित्रणातील आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरव, जनजागृती सेवा संस्थेकडून बदलापूर येथे विशेष सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, बदलापूर-गुरुनाथ तिरपणकर

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्याचे सुपुत्र आणि सध्या बदलापूर येथे वास्तव्यास असलेले वन्यजीव छायाचित्रकार सिताराम राऊळ यांनी आपल्या छायाचित्रण कलेच्या माध्यमातून जागतिक स्तरावर कोकणचा नावलौकिक वाढवला आहे. वन्यजीव छायाचित्रण क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'वाईल्डलाइफ फोटोग्राफी' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी 'इनव्हर्टिब्रेट व्हिजन' श्रेणीत उल्लेखनीय यश संपादन केले. जगभरातून प्राप्त झालेल्या ६५ हून अधिक छायाचित्रांमधून त्यांच्या छायाचित्राची निवड झाली. या यशाबद्दल लंडन येथे जागतिक स्तरावरील मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला. सिताराम राऊळ यांच्या या आंतरराष्ट्रीय यशाची दखल घेत जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने त्यांच्या शिरगाव आपटेवाडी, बदलापूर पूर्व येथील निवासस्थानी जाऊन विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार व राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर, उमेद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा जनजागृती ग्रुपचे सदस्य सुहास सावंत, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी दिलीप शिरसाठ आणि संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, संस्था अहवाल, निसर्गावर आधारित कविता संग्रह, संस्थेची सरस्वती प्रतिमा व भेटवस्तू देऊन राऊळ यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

गोमातेच्या सेवेतून शेती आणि मानवी जीवन समृद्धीचा संदेश!

अमृत गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्टमध्ये गोवर्धन पूजा उत्साहात, आमदार चरणसिंग ठाकूर यांची उपस्थिती, १५ दिवसांत बोअरवेल करून देण्याचे आश्वासन

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

गोमातेचे भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व असून, गोसेवा ही केवळ धार्मिक परंपरा नसून मानवी जीवन आणि शेतीव्यवस्थेला समृद्ध करणारी सेवा आहे. गोमातेचे संरक्षण, संवर्धन आणि तिचे शेतीतील योगदान समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अमृत गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, नरखेड येथे गोवर्धन पूजा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. १० नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमाला आमदार चरणसिंग ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



वसुबारसपासून सुरू झालेल्या धार्मिक आणि गोसेवेच्या उपक्रमाचा समारोप गोवर्धन पूजेने करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य सनतकुमार गुप्ता होते. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. नितीन फुके, डॉ. महाजन (नागपूर), नरखेड नगराध्यक्ष मनोज कोरडे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. मुकींदा जोगेकर तसेच तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या सहाय्यक आयुक्त डॉ. वसुधा नायर यांची उपस्थिती होती.

विशेष उपस्थिती म्हणून साध्वी अर्पिता दीदी (वादिवी आश्रम, तीनखेडा) आणि ह.भ.प. रोशन महाराज कळंबे, टोडापार यांची उपस्थिती लाभली. ट्रस्टचे अध्यक्ष हरीश खंडेलवाल आणि कोषाध्यक्ष सुरेंद्र शर्मा यांचीही यावेळी विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात विधिवत गोपूजा, गोवर्धन पूजा आणि भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीपूजनाने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी 'गोमाता, मानवी जीवन आणि शेती' या विषयावर मार्गदर्शन केले. भारतीय संस्कृतीमध्ये गोमातेचे स्थान, पशुधनाचे महत्त्व, शेती आणि पशुपालन यांचा परस्पर संबंध, सेंद्रिय शेतीमध्ये गोमातेचे योगदान तसेच गोवंशाचे संरक्षण व संवर्धन करण्याची सामाजिक जबाबदारी याविषयी विचार मांडण्यात आले.

यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर यांनी गोशाळेतील गायींच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले. येत्या पंधरा दिवसांत गोशाळेच्या परिसरात बोअरवेल करून देण्यात येईल, असे त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना स्पष्ट केले. गोमातेच्या सेवेसाठी पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण होणार असल्याने त्यांच्या या आश्वासनाचे उपस्थितांनी स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रस्टचे सचिव पुरुषोत्तम थोटे यांनी केले. संचालन रामेश्वर सेंदरे यांनी केले, तर आभार गुणवंत गिरडकर यांनी मानले. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त संजय गुरव, भगवान गिरडकर, दीपक ढोमने, मनीष दुर्गे, योगेश मांडवेकर, पंकज कुरेकर यांच्यासह नरखेड नगर परिषदेचे उपाध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका तसेच गाव व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धार्मिक श्रद्धा, गोसेवेचा संकल्प आणि पशुधन संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. मान्यवरांचे मार्गदर्शन आणि गोशाळेच्या विकासासाठी मिळालेल्या सकारात्मक आश्वासनामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. गोमातेचे संरक्षण आणि संवर्धन ही केवळ एका संस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

थोडक्यात

नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्ट्सतर्फे विदर्भातील पत्रकार आणि कुटुंबीयांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

डॉ. दंदे फाउंडेशन, भानूताई गडकरी ट्रस्ट आणि शासकीय दंत महाविद्यालयाचे सहकार्य लाभणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्ट्स (महाराष्ट्र) विदर्भ प्रांताचे वतीने रविवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी विदर्भातील पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० या वेळात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी डॉ. दंदे फाउंडेशन, डॉ. दंदे हॉस्पिटल, भानूताई गडकरी ट्रस्ट आणि शासकीय दंत महाविद्यालयाचे सहकार्य लाभले आहे. शिवाजीनगर येथील शिवाजी सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून माजी राज्यपाल आणि भारतीय विद्या भवनचे राष्ट्रीय अध्यक्ष बनवारीलालजी पुरोहित यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचा शिबिराचा शुभारंभ होईल.

या तपासणी शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पत्रकार आणि कुटुंबीयांनी आधी नोंदणी करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी अविनाश पाठक(९०९६०५०५८१/९८९००१९३८३) पराग जोशी (९८८१७१७०५) उदय अंधारे (९४२१८०५००३) यांना त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करून आपली नावे नोंदवावी. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त पत्रकार आणि कुटुंबीयांनी घ्यावा असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष अविनाश पाठक, सचिव पराग जोशी, उदय अंधारे, रवी गुळकरी प्रभृतींनी केले आहे.

'कीर्तन पहाट' व 'पहाटवारा'ला रेशीमबाग परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर


दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार, कला संगम कला सांस्कृतिक मंडळ, लोकमान्य सांस्कृतिक व क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ह्यकीर्तन पहाटह्णचे आयोजन करण्यात आले. यावेळी कला संगमचे अध्यक्ष अमर आकरे, कोषाध्यक्ष रवी ढोके, कमलेश भोयर, सनातन परिषदचे सुधीर सांगोळे आणि मिलिंद भाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संत तुकाराम उद्यान, रेशीमबाग येथे झालेल्या या कार्यक्रमात ह.भ.प अभिषेक महाराज घुसे यांनी अभंग, भजन आणि कीर्तनाच्या माध्यमातून दीपावलीचे आध्यात्मिक महत्त्व उलगडून सांगितले. घराघरांत दिवे प्रज्वलित करून बाहेरील अंधकार दूर केला जातो; त्याचप्रमाणे मनातील अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश निर्माण करणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुसऱ्या दिवशी, याच ठिकाणी स्वर्गीय संदीप लक्ष्मणसिंह गहेरवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'पहाटवारा' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, कला संगम कला व सांस्कृतिक मंडळ, लोकमान्य सांस्कृतिक व क्रीडा मंडळ, सनातन सांस्कृतिक कला व क्रीडा परिषद आणि श्री जगर्दबा माता देवस्थान, रेशीमबाग यांच्या विशेष सहयोगाने तसेच 'सेव्हन नोट्स'च्या माध्यमातून हा कार्यक्रम झाला. गहेरवार परिवारातील लताताई गहेरवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. 'पहाटवारा'मध्ये मुकुल पांडे यांच्यासह पल्लवी कुंभारे आणि शशांक मोरेकर यांनी विविध मराठी व हिंदी गीतांचे सादरीकरण केले. निनाद हिवराळे, मनोज विश्वकर्मा, वेद ढोके आणि शिव सरोदे यांनी वाद्यसाथ केली, तर प्रकाश वाकेकर यांनी निवेदन केले.

गोमाता पूजनासह आमगाव गणेशपुर व पदमपुर येथे गोवर्धन सोहळा साजरा

सामूहिक महाआरतीचे आयोजन; हनुमान मंदिर देवस्थान समितीचा पुढाकार, पशुधन व निसर्ग संवर्धनाचा संदेश





दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

भारतीय संस्कृतीत दिवाळी पाडवा, बलिप्रतिपदा आणि गोवर्धन पूजनाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. याच परंपरेचे जतन करीत आमगाव गणेशपुर पदमपुर येथे दिवाळी पाडवा अर्थात बलिप्रतिपदेच्या निमित्ताने गोमाता व तिच्या वासराचे पूजन, गोवर्धन पूजन तसेच सामूहिक महाआरतीचे आयोजन भक्तिमय वातावरणात करण्यात आले. पोलीस पाटील, गणमान्य नागरिक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा धार्मिक सोहळा उत्साहात पार पडला. पारंपरिक धार्मिक विधी, सामूहिक महाआरती आणि प्रसाद वितरणामुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

गोमाता पूजनातून पशुधन संवर्धनाचा संदेश

या सोहळ्यात गोमातेचे वासरासह करण्यात आलेले पूजन विशेष आकर्षण ठरले. भारतीय ग्रामीण जीवनात गोमातेला केवळ पशुधन म्हणून नव्हे, तर शेती, दुग्धव्यवसाय आणि ग्रामीण कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधार मानले जाते. त्यामुळे गोवत्स पूजनाच्या माध्यमातून पशुधनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच पशुधनाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

शेतकऱ्यांसोबत दिवाळी, बांधावरून संवाद!

दैनिक सिंहवाणी वृत्त विशेष

अतुल पांडे, सहायक संचालक (माहिती)

दिवाळीचा सण म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि नव्या आशांचा उत्सव. मात्र शेतकऱ्याच्या आयुष्यात हा प्रकाश तेव्हाच खऱ्या अर्थाने उजळतो, जेव्हा त्याच्या शेतात पीक डोलते, घरात समाधान असते आणि उद्याची चिंता नसते. यंदा मात्र निसर्गाच्या लहरीपणाने शेतकऱ्यांच्या आनंदावर विरजण घातले. पावसाची दीर्घ दडी; त्यामुळे शेतातील पिके करपली, फळबागा संकटात सापडल्या आणि शेतीच्या भविष्याबद्दल चिंता वाढली. अशा परिस्थितीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीचा आनंद शेतकऱ्यांसोबत साजरा करण्याचा निर्णय घेतला आणि नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा या गावी मुक्काम केला. मुख्यमंत्र्यांचा हा दौरा केवळ सण साजरा करण्यापुरता नव्हता, तर ग्रामीण भागातील जगण्याचा संघर्ष, शेतकऱ्यांच्या वेदना आणि त्यांच्या अपेक्षा समजून घेण्याचा एक सकारात्मक प्रयत्न होता.

नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा हे शेतीला केंद्रस्थानी ठेवून जगणारे गाव. १९४८ मध्ये स्थापन झालेल्या ग्रामपंचायतीचा ग्रामविकासाचा प्रवास आजही सुरू आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ४ हजार २६४ लोकसंख्या आणि ८४४ कुटुंबे असलेल्या या गावाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. कापूस, तूर, सोयाबीन, हरभरा, गहू यांसोबत संत्रा आणि मोसंबीच्या बागाही येथील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा आधार आहेत.

७ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री गावात दाखल झाले, तेव्हा ग्रामस्थांच्या उत्साहाला उधाण आले होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले. गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रार्थनास्थळात सहभागी होत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन केले. गुरुकुंज मोझरी येथील भजन मंडळाच्या सादरीकरणाने वातावरण भक्तिमय झाले. राष्ट्रसंतांची ग्रामगीता केवळ आध्यात्मिक विचार मांडत नाही, तर गावाच्या सर्वांगीण विकासाचा मार्गही दाखवते. संकटाच्या काळात माणसाला उभे राहण्याचे बळ देणारे हे विचार या प्रसंगी अधिकच समर्पक ठरले.

या भेटीचे सर्वाधिक भावनिक वैशिष्ट्य म्हणजे मुख्यमंत्र्यांनी लोहारी सावंगा या गावातील शेतकरी रामभाऊ बालपांडे यांच्या घरी केलेला रात्रभर मुक्काम. राज्यात सत्तेच्या सर्वोच्च पदावर असलेली व्यक्ती आपल्या घरात येणार, ही बाब बालपांडे कुटुंबासाठी आनंदाची आणि अभिमानाची होती. घरातील सदस्यांनी पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांनी कुटुंबीयांशी आपुलकीने संवाद साधला आणि घरातील वातावरणात सहभागी होत भोजनाचा आस्वाद घेतला.



ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाच्या घरात बसून भोजन करणे आणि त्यांच्यासोबत वेळ घालवणे, हा या दौऱ्यातील महत्त्वाचा भाग ठरला. मुख्यमंत्र्यांच्या या साधेपणामुळे गावातील नागरिकांनाही जवळीक जाणवली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमुळे गावातील महिलांनाही विशेष आनंद झाला. आजवर प्रत्यक्ष मुख्यमंत्री पाहण्याची संधी न मिळालेल्या अनेक महिलांसाठी हा अनुभव अविस्मरणीय ठरला.

मात्र या भेटीचे आणखी एक अधोरेखित करणारे महत्त्व होते ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांना मिळालेल्या व्यासपीठाचे. पिकांचे नुकसान, सिंचनाची कमतरता, वन्यप्राण्यांचा उपद्रव, संत्रा उत्पादकांच्या अडचणी आणि गावातील मूलभूत सुविधांचे प्रश्न मुख्यमंत्र्यांसमोर आले. दहा शेतकऱ्यांना सिंचन विहिरींचा लाभ, २४३.३५ लाख रुपयांचा साठवण तलावाचा प्रस्ताव, खोरी प्रकल्पाला मान्यता आणि विंधन विहिरींबाबत घेतलेला निर्णय यामुळे पाण्याच्या प्रश्नावर दीर्घकालीन उपाययोजनांची अपेक्षा निर्माण झाली.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान, दुष्काळी मदत आणि वीजबिल माफी यांसारख्या उपाययोजनांची उल्लेख झाला. दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी केवळ गावातील बैठकीपुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही. ८ नोव्हेंबर रोजी सोनेगाव रिठी आणि कोहळी येथे शेतांच्या बांधावर जाऊन कापूस आणि तूर पिकांची पाहणी केली. दिलीप सरोदे आणि बाबुराव काळे यांच्यासारख्या शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. उन्हात शेतात उभे राहून पिकांची अवस्था पाहणे, हा शेतकऱ्यांचा जगण्याशी जोडलेला संवाद होता. कारण शेतकऱ्यांच्या अडचणींची खरी तीव्रता कागदावरील आकडेवारीपेक्षा बांधावर अधिक स्पष्टपणे दिसून आली.

लोहारी सावंग्याचा हा दौरा ग्रामीण महाराष्ट्राच्या वास्तवाचे दर्शन घडवणारा ठरला. गावाचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि योजनांच्या आकडेवारीत मोजता येत नाही. शेतकऱ्याला पाणी मिळणे, त्याच्या पिकाला संरक्षण मिळणे, उत्पादनाला बाजारपेठ मिळणे आणि संकटाच्या काळात शासनाचा आधार मिळणे यातच खऱ्या ग्रामविकासाचे सार दडलेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लोहारी सावंगा येथील दिवाळी मुक्कामाने दिवाळीच्या प्रकाशात शेतकऱ्यांच्या मनातील चिंतेचे सावट दूर करण्यासाठी दिलेला विश्वास नक्कीच आश्वासक ठरणारा आहे.

न्यू एनर्जी बहुउद्देशिय संस्थेद्वारा दत्तक जागरण महिन्या निमित्य बाल महोत्सव

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्र शासन व राज्य शासन महिला व बाल विकास अंतर्गत मान्यता प्राप्त न्यू एनर्जी बहुउद्देशिय संस्थेद्वारा संचालित राष्ट्रीय दत्तक ग्रहण शिशुगृह प्लॉट नं. १७६ पंचवटी नगर इंद्रायटटी चौक, शितला माता मंदिरच्या मागे, नागपुर आहे.

मागील २१ वर्षापासुन महिला व बाल विकास विभागाच्या मान्यतेने ० ते ६ वयोगटातील अनाथ, अनौरस, बेसहारा बालकांकरिता काळजी संरक्षण व पुनर्वसनचे कार्य संस्था करित आहे. आता पावेतो २२५ बालकांना देशाअंतर्गत व ९ बालकांना विदेशात मिशन वात्सल्य कारा नियमानुसार दत्तक देण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे वावर्षी सुध्दा नोव्हेंबर महिना जागतिक दत्तक जागरण महिना संस्थेद्वारा आयोजित आहे. दि.१४ नोव्हेंबर रोजी बालक दिनाचे औचित साधुन सकाळी ११ वाजता. भव्य बालमहोत्सव आयोजित करण्यात आला आहे. प्रसंगी महिला व बाल विकास विभागाचे विभागिय उपायुक्त नागपुर विभाग अर्पणा कोल्हे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनिल मेसरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, बाल कल्याण समिती, नागपुर अध्यक्षा छाया राऊत यांच्या उपस्थितीत आणी माजी आमदार गिरिश व्यास यांच्या मुख्य उपस्थित व आपल्या उपस्थितीत बालमहोत्सव आयोजित केला आहे.

गणेशपूर-भवभुतीनगर येथे नवनिर्मित सभामंडपाचे थाटात लोकार्पण

खासदार डॉ. नामदेवरावजी किरसान यांच्या स्थानिक विकास निधीतून उभारणी; प्रतिनिधी दुष्यंत किरसान यांच्या हस्ते उद्घाटन, ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

तालुक्यातील गणेशपूर-भवभुतीनगर येथे खासदार डॉ. नामदेवरावजी किरसान यांच्या स्थानिक विकास निधीतून उभारण्यात आलेल्या नवनिर्मित सभामंडपाचा लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पिंकेश शेंडे यांच्या अथक प्रयत्नांमुळे साकार झालेल्या या सभामंडपाचे लोकार्पण खासदारांचे प्रतिनिधी तथा युवा नेते दुष्यंत किरसान यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना दुष्यंत किरसान म्हणाले की, गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा सभामंडप अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विवाह समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामसभा तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी ग्रामस्थांना आता हक्काची आणि स्वतंत्र जागा उपलब्ध झाली आहे. गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रामस्थांच्या वतीने खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. नवनिर्मित सभामंडपामुळे गावातील सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. या लोकार्पण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून रामसिंग चव्हाण, संजय बहेकर, इशुलाल भालेकर, राधाकिशन चुटे, रामेश्वर श्यामकुवर, अभय ढेंगे, पिंकेश शेंडे, राजेश डोंगरवार, आसाराम धकाते, मधु तावडे आणि काशिराम मारबते यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पिंकेश शेंडे, राजेश डोंगरवार, प्रभू निखारे, गोपाल ठाकरे, विनोद तावडे, श्रीराम बागडे, भैया भाऊ धकाते, काशिनाथ मारबते, श्रीराम ब्राह्मणकर, नेत्रामजी ब्राह्मणकर, जीआलाल गुजर, लिलाबाई ठाकरे, जीरन बाई ब्राह्मणकर, सुनीताबाई बागडे, कौतुकाबाई बागडे, मोना बाई निखारे, उर्मिलाबाई धकाते, नामदेव बागडे, रुपेश निखारे, दूरचंद मारबते, राजू धकाते, प्रवीण निखारे, सतीश ब्राह्मणकर, मयाराम मेश्राम आणि जयपाल मेश्राम यांच्यासह समस्त गणेशपूर-भवभुतीनगर ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. गावाच्या विकासात आणखी एका सुविधेची भर पडल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे २० व २१ नोव्हेंबर रोजी आयोजन

संमेलनाध्यक्ष डॉ. प्रभा गणोरकर, स्वागताध्यक्ष रविंद्र फडणवीस, विविध विषयांवर परिसंवाद, कथा-कविता वाचन व सांस्कृतिक कार्यक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मराठी भाषा विभाग, महाराट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित महिला महाविद्यालय, नागपूर यांच्या वतीने सहकार्याने नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे येत्या, २० व २१ नोव्हेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. प्रभा गणोरकर असून स्वागताध्यक्ष स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस आहेत.

महिला महाविद्यालय, १५२, गणेशनगर येथे होणाऱ्या या दोन दिवसीय संमेलनाचे उद्घाटन शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य श्रीपाद अपराजित, डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रकाश होळकर आणि महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रीता सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

उद्घाटन सोहळ्यानंतर 'सेतू की संकट?' या विषयावर पहिला परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. वाच्या अध्यक्षस्थानी वसुंधरा काशिकर (पुणे) राहणार असून, रेणुका देशकर, वृषाली देशपांडे, अश्विनी जांभेकर-पिटळे, मनीषा रिठे आणि क्षिप्रा मानकर सहभागी होणार आहेत. त्यानंतर 'मी अलीकडे वाचलेल्या स्त्रियांच्या कविता' या विषयावर परिसंवाद होईल. सुनील यावलीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात डॉ. अमृता इंदुरकर, माधवी भट, संघमित्रा खंदारे आणि मनोज मोहिते सहभागी होतील. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी, २१ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता 'समाजमाध्यमे : जोखीम आणि गरज' या विषयावर परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अजय देशपांडे राहणार असून प्रा. डॉ. संदीप तुंडूरवार, मोहिनी मोडक, सोनाली नश्चिने आणि ज्ञानेश्वर गटकर सहभागी होतील. यानंतर कथा वाचन आणि स्वरचित कविता वाचन सत्र आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पौर्णिमा तावडे व कुरखेडाच्या संगीता ठलाल यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

दुपारी २.१५ वाजता 'बोली साहित्यातील लेखिकांचे योगदान' या विषयावर प्रा. डॉ. काशिनाथ बऱ्हाटे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होईल. यात प्रा. डॉ. राजकुमार मुसणे, प्रा. डॉ. रावसाहेब काळे आणि शैलजा गावंडे यांचा सहभाग राहील. संमेलनाचा समारोप दुपारी ४.१५ वाजता प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. वसंत आबाजी डहाके यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रतिभा इंगोले यांची उपस्थिती राहणार आहे.

या दोन दिवसीय संमेलनातून महिला साहित्यिकांना संवाद, विचारांची देवाणघेवाण आणि साहित्यिक अभिव्यक्तीसाठी एक समृद्ध व्यासपीठ उपलब्ध होणार असून, साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

खासदार शिव किल्ले स्पर्धेच्या परीक्षण परिक्रमेला नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रारंभ

परीक्षकांच्या तीन चमूंकडून १२५ हून अधिक किल्ल्यांचे होणार परीक्षण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास, शौर्य आणि स्थापत्यवैभव नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित 'खासदार शिव किल्ले स्पर्धा २०२६'च्या परीक्षण परिक्रमेला गुरुवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला. यंदा या स्पर्धेत १२५ हून अधिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती सहभागी झाल्या असून, परीक्षकांच्या तीन चमू या परीक्षण परिक्रमेदरम्यान शहरातील शालेय व खुल्या गटांतर्गत विविध ठिकाणी साकारलेल्या किल्ल्यांची पाहणी करून त्यांचे परीक्षण करणार आहेत. परीक्षकांच्या चमूत सुषमा ओझा, सुवर्णा कडतकर, अंकुश नेवलकर, कस्तुरी बावणे, शंतनू इंगळे, अभिजीत जाधव, मनिषा नागपुरे, शीतल वैद्य, रसिका रिसालदार, डॉ. आनंद मांजरखेडे, डॉ. श्रीकांत पारखी, प्रविण योगी, आशीष येरंडे यांचा समावेश आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी या उपक्रमाचे कौतुक केले. अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाविषयी अभिमान आणि गड-किल्ल्यांविषयी आकर्षण निर्माण होण्यास मदत होते. नव्या पिढीला आपल्या समृद्ध ऐतिहासिक वारशाची ओळख करून देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले. किल्ल्यांच्या माध्यमातून इतिहास, संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचेही त्यांनी सांगितले.



यावेळी सर्व नगरसेवक बंडू राऊत, श्रीकांत आगलावे, हेमंत बरडे, स्पर्धेचे संयोजक अतुल गुरू, सहसंयोजक संजय बंगाले, हेमंत देशपांडे, जे.एस.बावनकर, मंगेश बारसागडे, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, अविनाश घुशे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

थोडक्यात

लायन्स क्लब नागपूर सेवन स्टारच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनव पद्धतीने साजरी केली आदिवासी बांधवांसोबत अनोखी दिवाळी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

लॉयन्स चळवळीच्या भारतातील ७० वर्षपूर्तीनिमित्त आणि धन्वंतरी आरोग्यदिनाप्रित्यर्थ लॉयन्स क्लब नागपूर सेवन स्टारच्या पदाधिकाऱ्यांनी नागपूरपासून २०० किलोमीटर दूर गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यामधील दुर्गम दासगड/पिंपरखारी/चिंचगड जंगल परिसरात श्रीसंत तवाडे दीपस्तंभ सेवामंदिरामध्ये आदिवासी,गरीब,गरजू २५० महिलांना साडी/लुगडे आणि २५० पुरुषांना कपडे तर बालकांना चॉकलेट्स वाटप करीत,फराळपाणी देऊन अभिनव पद्धतीने दिवाळी साजरी केली. या उपक्रमाला आमदार संजय पुराम(देवरी क्षेत्र),लॉ.भरत भलगट(लायन्स मल्टिपलचे सभापती),लॉ.डॉ. मुधोजी राजे भोसले(लायन्स क्लब ३२३४ एच-वनचे माजी प्रांतपाल),संत शिरोमणी अमररत्न तवाडे महाराज,प्रमोद संगीडवार(सभापती,कृषी उत्पन्न बाजार समिती,देवरी), प्रज्ञा संगीडवार(उपाध्यक्ष,नगरपंचायत, देवरी) विजय कश्यप (उपसभापती,कृषी उत्पन्न बाजार समिती, देवरी), पिंकी कटकवार(महिला व बालकल्याण सभापती,देवरी) आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

सर्वप्रथम आरोग्य देवता भगवान श्रीधन्वंतरी प्रतिमा पूजन-मालारपण केल्यानंतर,मान्यवर अतिथींचे शाल-"ग्रामगीता"ग्रंथ-पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रकल्प प्रमुख लॉ. डॉ.प्रमोद रक्षमवार यांनी प्रास्ताविक भाषणातून लॉयन्स सेवाकार्याची माहिती दिली. सर्व मान्यवर अतिथींनी या अभिनव उपक्रमांची आपल्या भाषणातून प्रशंसा केली. कार्यक्रमाचे संचालन लॉ.डॉ.शांतीदास लुंगे(अध्यक्ष,लॉयन्स क्लब नागपूर सेवन स्टार) यांनी तर आभारप्रदर्शन लॉ.पारस कटकवार (अध्यक्ष, देवरी लॉयन्स क्लब)यांनी केले. कार्य यशस्वीतेसाठी लॉ. आलोकदास, लॉ.साधना रक्षमवार, लॉ. डॉ. अजय सावरकर, लॉ.सीए अजित दामले, लॉ.सुमित सिन्हा, लॉ. इंजि. दिनेश दुवा,लॉ.ओमप्रकाश पांडे,लॉ.सौदामिनी लुंगे, लॉ.डॉ.सीमा दुवा,लॉ.नीलाद्री चक्रवर्ती, लॉ.सुनील वंजारी, लॉ.इंजि.नरेंद्र मातुरकर यांनी अथक परिश्रम घेतलेत.सदर कार्यक्रमाला आदिवासी क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुर्गम पाड्यावरील आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर दिवाळी सणाचा आनंद फुलविणे हाच या अभिनव उपक्रमाचा मुख्य उद्देश होता, हे विशेष !

सिटीजन वेल्फेअर असोसिएशनची दिवाळी निमित्त आदिवासी बांधवांना कपडे व फराळ भेट



दै. सिंहवाणी वृत्त, बदलापूर-गुरुनाथ तिरपणकर

सिटीजन वेल्फेअर असोसिएशन- बदलापूर या संस्थेने दिवाळीच्या पहिल्या दिवशी, आदिवासी बांधवांच्या समवेत दिवाळी साजरी केली. दरवर्षी संस्थेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना कपडे वाटप व फराळ वाटप आणि लहान मुलांना कपड्यांसोबत खाऊ देऊन त्यांच्या समवेत दिवाळीचा पहिला दिवस साजरा केला जातो. यावर्षीही आपली ही परंपरा कायम राखत, धनत्रयोदशीच्या निमित्ताने सिटीजन वेल्फेअर असोसिएशनचे सदस्य बदलापूर जवळील कोंडेश्वर येथील तारवाडी या आदिवासी पाड्यावर पोहोचले.सदस्यांनी पाड्यावरील सर्व सदस्यांना कपडे वाटप केल्यानंतर, गावातील प्रत्येक घरी भेट देऊन त्यांना दिवाळी फराळ व शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाला सिटीजन वेल्फेअर असोसिएशनचे दिलीप नारकर, राजेंद्र नरसाळे, गुरुनाथ तिरपणकर, सुहास सावंत, मिलिंद मिसाळ, दिलीप शिरसाट, सुरेश सावंत, विलास हंकारे, मगेश सावंत, सावंत, भाऊ सावंत, रमेश सावंत, विलास साळगावकर, किशोर सारंग, अनिल पंडित, विष्णू मिरकुले, बनकर सर, संजय किंडले, किशोर गुरव, सुवर्णा इसवलकर, श्याम सोमजी तसेच ध्रुव अकॅडमीचे संचालक महेश सावंत व त्यांचे विद्यार्थिनी पूजा कुबल, तनिष्का कदम, वैभवी गायकवाड, साक्षी शिंदे, श्रेया सोवळे उपस्थित होते.

जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात

पालक सचिव असीम कुमार गुप्ता यांचे निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यात उद्भवलेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज असून जलव्यवस्थापनाचे प्रभावी, वैशिष्ट्यपूर्ण व दूरगामी नियोजन करावे. तसेच ही समस्या अधिक गंभीर होऊ नये यासाठी प्रशासनाने संवेदनशीलता व सतर्कतेने परिस्थिती हाताळण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालक सचिव असीम कुमार गुप्ता यांनी आज अधिकाऱ्यांना दिले.

नियोजन भवन येथील बैठकीत जिल्ह्याचे पालक सचिव असीम कुमार गुप्ता यांनी आज पाणीटंचाईचा आढावा घेतला. या बैठकीस नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, महापालिका आयुक्त डॉ.विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त बी.अंकित, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. गुप्ता म्हणाले, दरवर्षी उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या समूळ उच्चाटनासाठी दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असून प्रस्तावित प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही यासाठी दूरगामी व सूक्ष्म नियोजनावर भर देण्यात यावा.

'स्थानिक नेतृत्वाचा सहभाग घेऊन संघटितपणे काम करावे ' स्थानिक परिस्थितीची जाण असल्यामुळे पाणीटंचाईच्या संकटाशी सामना करताना प्रशासनाने स्थानिक नेते आणि लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून त्यांच्या सहभागाने कामे करावीत. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा. पाणी कपातीमुळे किंवा मर्यादित पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी. पाणीपुरवठा किंवा कपातीबाबत वेळोवेळी पूर्वसूचना द्यावी व नंतरच नियोजन करावे, असे निर्देश पालक सचिवांनी दिले.

नागरिकांना किमान पुरेसे पाणी पुरवण्याची जबाबदारी प्रशासनाची



जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पावर अवलंबून असलेल्या नगरपालिका व नगरपरिषदांची माहिती श्री गुप्ता यांनी यावेळी घेतली. कोणत्या प्रकल्पातील पाण्यावर रब्बी हंगाम राबवला जाऊ शकतो आणि कोठे शक्य नाही, याबाबत नागरिकांना सूचित करण्यात आले असून प्रत्येक ग्रामपंचायतीला याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आमदार तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना प्रत्येक प्रकल्पाच्या नियोजनाची सविस्तर माहिती देण्यात येत असून त्यांच्याशी समन्वय असल्याचे पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता प्रांजली टोंगसे यांनी सांगितले. निम्न वेणा प्रकल्पाची मागणी ६२.७७२ दलघमी असून, त्याचे आरक्षण १४३.६३७ दलघमी आहे. प्रकल्पांमध्ये भविष्यातील ३० वर्षांचे पाणी आरक्षण धरले जाते. याबाबत पाणी कपातीच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येत असून वार्षिक पाणीपुरवठ्याचा अंदाज घेऊन सिंचनासाठीदेखील पाणी उपलब्ध करून देत असल्याचे कार्यकारी अभियंत्यांनी सांगितले. नागरिकांना किमान पुरेसे पाणी पुरवण्याची जबाबदारी प्रशासनाने प्राधान्याने पार पाडावी, असे पालक सचिवांनी स्पष्ट केले.

अधिकाऱ्यांनी क्षेत्र भेटीतून उपाययोजना कराव्यात

पाणीटंचाई निवारणासाठी सूचना देताना श्री गुप्ता यांनी अधिकाऱ्यांनी फिल्डवर जाऊन प्रत्यक्ष आढावा घ्यावा, जुन्या विहिरींचा शोध घ्यावा, विहिरी अधिकृत करून घ्याव्या, पाणी गळती होणार नाही याची काळजी घ्यावी व नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असे सांगितले.

प्रशासनाने जिल्ह्याचा ८२ कोटीचा आराखडा तयार केला असून यात १५ वा वित्त आयोग, डीपीडीसी (नागरी दलितेतर योजना), जिल्हा खनिज निधी, पेयजल टंचाई निवारणार्थ निधी आदी योजनांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने तीन श्रेणींमध्ये (ग्रीन, यलो आणि रेड झोन) वर्गवारी केली असून त्यानुसार पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती संबंधितांनी दिली.

पाणी गळती रोखण्यासाठी उपाययोजना कराव्या

पाण्याचा अपव्यय आणि गळती रोखण्यासाठी जलदगतीने दुरुस्ती कार्य हाती घ्यावे. औद्योगिक व व्यावसायिक वापराच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही योग्य ते नियम पाळण्यात यावे. उद्याने व इतर छतांवरील वापरासाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरण्यात यावे, इत्यादी निर्देश पालक सचिवांनी महापालिकेला दिले. काही भागात पाणी कपातीचे नियम लागू असताना, काही ठिकाणी आवश्यकतेपेक्षा अधिक पाणी वापरले जात असल्याचे निदर्शनास आले असता प्रत्येक भागात पाण्याचा वापर आणि कपातीचे नियम शिस्तबद्ध पद्धतीने लागू करण्यात आले असल्याचे महापालिका आयुक्त श्री इटनकर यांनी सांगितले.

विहिरींचे पुनरुज्जीवन करण्यात यावे

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा आढावा घेताना श्री गुप्ता यांनी पाणी पुरवठा योजना, विहिरींचे पुनरुज्जीवन आणि अपूर्ण कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. पाणी टंचाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत तातडीची कामे प्राधान्याने पूर्ण करावी. यासाठी डीपीसीमधून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्राधम्याने कामे पूर्ण करण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी. संपूर्ण जिल्ह्यातील जुन्या व विनावापर विहिरी शोधून त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश श्री गुप्ता यांनी दिले.

नागरिकांना सुरळीत व वेळेवर पाणी मिळावे यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीयनि काम करण्याबाबत श्री गुप्ता यांनी सांगितले. विविध विभागांनी केलेल्या सादरीकरणाच्या माध्यमातून संबंधितांनी जल व्यवस्थापनाच्या सूक्ष्म नियोजनावर भर देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. विविध विभागांचे अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत आता १०० टक्के पर्यंत अनुदान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' अंतर्गत ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया महाडिबीटी २.० प्रणालीवर सुरू झाली आहे. जिल्ह्यातील गोड्या पाण्यातील (भूजलाशयीन) मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी विविध घटकांवर लाभार्थ्यांना ५० ते १०० टक्के पर्यंत थेट अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे. योजनेअंतर्गत संस्थेकडील मामा तलाव, जिल्हा परिषद, पाटबंधारे तलाव दुरुस्ती, गाळ काढणे व पुनरुज्जीवनसाठी २ लाखाच्या प्रकल्पासाठी १०० टक्के अनुदान दिले जाते.

नवीन मत्स्यसंवर्धन तलाव बांधकाम व निविष्ठा १२ लाखाच्या प्रकल्पाकरीता अराखीव गटास ५० तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान, मत्स्यसंवर्धन अस्तित्वातील तळ्यात पॉलिथिन अस्तरीकरण १२ लाख प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के, मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मिती ८ लाख प्रकल्प किंमतीच्या अराखीव गटास ५० टक्के तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान दिले जाते.

सौरऊर्जा यंत्रणा उभारणी १० लक्ष किंमतीच्या प्रकल्पास अराखीव गटास ५० तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान, भूजल पॅडल व्हील एरेटर खरेदी किंमत १.५० लाख किंमतीच्या ५० तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान, माती व पाणी परीक्षण संच खरेदी १.५० लाख किंमतीच्या अराखीव ५० टक्के तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान, फिरते मासे विक्री केंद्र ३ लक्ष किंमतीच्या संस्थांना ५० तर खाजगी गटास २५ टक्के अनुदान, सोलर शीतपेटी खरेदी १ लक्ष किंमतीच्या अराखीव गटास ५० तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. नवीन बर्फ कारखाना उभारणे, आधुनिकीकरण ४० ते १५० लक्ष किंमतीच्या ५० टक्के, किरकोळ मासळी विक्रेत्यांना साहित्य खरेदीवर अनुदान ०.२५ लक्ष किंमतीच्या अराखीव ५० टक्के तर राखीव गटास ६० टक्के, महिला मासळी विक्रेत्यांकरिता हॅण्डग्लोज व गमबूट संच वाटप किंमतीच्या १०० टक्के, जीवरक्षक उपकरणांवर अनुदान ०.२० लक्ष किंमतीच्या ५० टक्के, मासे सुकविण्यासाठी सौर संयंत्र खरेदी २५ लक्ष किंमतीच्या संस्थांना ५० तर वैयक्तिक २५ टक्के अनुदान, माशांच्या कचऱ्याचा पुनर्वापर प्रकल्प (भूजल) २४ लक्ष किंमतीच्या ७५ टक्के, बोट खरेदी ०.३० ते १.२० लक्ष किंमतीच्या अराखीव ५० टक्के तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान, तयार जाळी व बिगर यांत्रिक नौकांवर अनुदान (सुधारित) ०.२४ लक्ष किंमतीच्या प्रकल्पास अराखीव ५० टक्के तर राखीव गटास ७५ टक्के अनुदान, मच्छीमार सहकारी संस्थांचा विकास याबाबीसाठी एकूण २.२५ ते ५.२५ लक्ष किंमतीच्या शासकीय नियमांनुसार अनुदान दिले जाते.

या योजनांच्या लाभासाठी mahadbt.maharashtra.gov.in पोर्टलवर अर्ज करता येतो. आधार क्रमांकाचा वापर करून नवीन नोंदणी किंवा आपल्या MahaID ने लॉगिन करता येईल. मुख्य पृष्ठावर योजनेसाठी अर्ज करा निवडून ड्रॉपडाउनमधून मत्स्यव्यवसाय विभाग निवडा. त्यानंतर अजार्चा प्रकार निवडा वैयक्तिक, सहकारी संस्था आणि प्रोफाईल माहिती भरा.

शिधापत्रिका, आवश्यक कागदपत्रे व लागू असल्यास जात प्रमाणपत्र जोडून प्रोफाईल जतन करा. उपलब्ध भूजलाशयीन योजनांच्या यादीतून आवश्यक घटक निवडा, प्रकल्प तपशील जोडा आणि अर्ज सादर करा. एका आर्थिक वर्षात एका लाभार्थ्याला १ मुख्य योजना व १ आंतरराज्य अभ्यास दौरा अशा जास्तीत जास्त दोनच योजनांसाठी अर्ज करता येतो. अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय किंवा ०७१२-२५५४०४७, acfnagpur@ gmail.com या दुरध्वनी क्रमांक, ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन मत्स्यव्यवसाय विकास विभागाने केले आहे.

आरबीआय चौक परिसरात भिक्षा मागणाऱ्या चार बालकांसह तीन महिलांना ताब्यात, चारही बालकांची सुरक्षित बालगृहात रवानगी

चाइल्ड हेल्पलाईन १०९८, सामाजिक सुरक्षा विभाग व बर्डी पोलिसांची संयुक्त कार्यवाही

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर शहरातील आरबीआय चौक परिसरात चार अल्पवयीन बालके भिक्षा मागत असल्याची माहिती दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी चाइल्ड हेल्पलाईन १०९८ ला प्राप्त झाली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, नागपूर व चाइल्ड हेल्पलाईनच्या माध्यमातून तातडीने कार्यवाही करण्यात आली.



सदर कार्यवाहीदरम्यान चार अल्पवयीन बालके व त्यांच्यासोबत असलेल्या तीन महिलांना सामाजिक सुरक्षा विभाग व बर्डी पोलीस स्टेशनच्या मदतीने ताब्यात घेण्यात आले. बालकांच्या सुरक्षिततेच्या व संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर चारही बालकांची शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करून त्यांना सुरक्षित बालगृहात दाखल करण्यात आले आहे.

बालकांना भिक्षावृत्तीपासून मुक्त करून त्यांचे संरक्षण करणे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे तसेच त्यांच्या सर्वोत्तम हिताच्या दृष्टीने आवश्यक पुनर्वसन सेवा उपलब्ध करून देणे हा या कार्यवाहीचा मुख्य उद्देश आहे. बालकांचे शोषण, दुर्लक्ष व असुरक्षिततेपासून संरक्षण करण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे व सामाजिक सुरक्षा विभागाचे पोलीस निरीक्षक दर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांच्या नेतृत्वात पार पडली. यामध्ये चाइल्ड हेल्पलाईनचे प्रतिनिधी मीनाक्षी धडाडे, मंगला टेंभुर्णे, मेघा पाटील व सचिन धोतरकर, सामाजिक सुरक्षा विभागाचे संजय सोनवणे, दीपक झाडे, गजानन उघडे तसेच बर्डी पोलीस स्टेशनच्या कर्मचारी उषा सलामे यांनी सहभाग घेतला. नागरिकांना आवाहन करण्यात येते की, परिसरात कोणतेही बालक भिक्षा मागताना, असुरक्षित अवस्थेत किंवा अडचणीत आढळल्यास त्यांनी तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन १०९८ या २४ तास कार्यरत असलेल्या मोफत हेल्पलाईन क्रमांकावर माहिती द्यावी. बालकांच्या संरक्षणासाठी नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे.

नेहरूमार्केट परिसरात बेवड्यांचा आतंक दुकानदारावर जीवघेणा हल्ला

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील नेहरू मार्केटच्या मागे दारुड्यांचा आतंक दिवसेंदिवस वाढत असल्याने स्थानिक पोलीसांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

प्राप्त माहितीनुसार दि. ११ नोव्हेंबर २०२६ रोजी नेहरू मार्केट मागे दोन दारुड्यांनी एका युवकावर जिवघेणा हल्ला चढवत त्याला गंभीररित्या जखमी केले. फिर्यादी अशोक मनोहर भगत वय ५७ रा. गायकी लेआऊट सावनेर हे नेहरू मार्केट येथील आशापुरा ट्रेडर्स या दुकानात कार्यरत असुन दि. ११ नोव्हेंबर च्या सायंकाळी ७ च्या दरम्यान



दुकाच्या मागे असलेल्या गोदामात ग्राहकांकारीता काहितरी साहित्य आणण्यासाठी गेले असता गोदामाच्या शटरजवळ दोन युवक दारू पीत असल्याचे दिसून येताच त्यांना 'शटर उघडायचे आहे म्हणून बाजूला व्हा' म्हटले असता दारुच्या नशेत गुंग असलेल्या बेवड्यांनी त्याला शिवीगाळ करत चक्क लाताबुक्क्यांनी हल्लाच चढवला.

तर दुसऱ्याने काहीतरी भारदार वस्तूने डोक्यावर वार केल्याने त्यास गंभीर इजा झाल्या. परिसरात उपस्थित काही लोकांनी मध्यस्थता करत पीडीत अशोक भगतला सोडवत दुकानात घेऊन आले. पीडित अशोक भगते सावनेर पोलीस स्टेशन गाठत सदर घटनेची रितसर तक्रार नोंदवली असता सावनेर पोलीसांनी दोन अज्ञात आरोपींच्या विरोधात अप.क्र.११०६ नुसार गुन्ह्याची नोंद करत भारतीय दंड संहिता कलम ११८ (१),३५२ नुसार गुन्हाची नोद करत प्रकरण तपासात घेतले आहे.

नेहरू मार्केट मार्केट परिसराला लागतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असुन सदर श्रध्दास्थानी दिवसभर महिला पुरुष डॉ. बाबासाहेबांना मानवंदना देण्यास पोहचतात. अश्या ठिकाणी दारुड्यांचा हौदस, पुतळा परिसरालगत सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर लघुशंकासारखे गलीच्छ कृत्य काही समाजकंटक करतात. तर सदर परिसर हे अती वर्दळीच्या ठिकाणी असल्याने सदर भागातून महिला तसेच शालेय, महाविद्यालयी व शिकवणी विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक शिक्षिका सोबतच परिसरात राहणाऱ्या त्रास सहन करावा लागत आहे.

सदर विषयाच्या अनेक तक्रारी होऊन सुध्दा स्थानिक पोलीसांद्वारे उपाययोजना होत नसल्याचे अनेक नागरिकांनी बोलून दाखविले तर परिसरातील अनेक महिलांच्या मते सावनेर पोलीस स्टेशन प्रभारी या सुध्दा महिला असुन अश्या संवेदनशील विषयावर त्यांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त कार्यालय पत्ता : खानखोजे नगर, कल्पना ज्वेलर्स बिल्डींग, मानेवाडा रोड, नागपूर

ई-निविदा सूचना-1
ग्रामपंचायत अरोली
पंचायत समिती मौदा जि.प. नागपूर.

अनु क्र	बांधकामाचे नाव	कामाची अंदाजे किमंत	निविदा फी	अनामत रक्कम	निविदा स्वीकृतीचे दिनांक
1	CONSTRUCTION OF CEMENT CONCRETE DRAIN AT GP AROLI TAH. MOUDA. (FORM Shri. Kailas Mandare house To shri. Nausad Kureshi House)	200000/-	500/-	2000/-	दि. 13/11/2026 ते 19/11/2026 ला सायंकाळी 6.00 पर्यंत
2	CONSTRUCTION OF CEMENT CONCRETE DRAIN AT GP AROLI TAH. MOUDA. (FORM Shri. Arif Shaikh house To shri. Prashant Adgulkar House)	200000/-	500/-	2000/-	दि. 13/11/2026 ते 19/11/2026 ला सायंकाळी 6.00 पर्यंत
3	CONSTRUCTION OF VYAYAM SHALA AT GP AROLI TAH. MOUDA.	1250000/-	1000/-	12200/-	दि. 13/11/2026 ते 19/11/2026 ला सायंकाळी 6.00 पर्यंत

ग्रामपंचायत **अरोलीत** वरील कामाकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. तरी पंजीकृत कंत्राटदारांनी mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई- निविदा सादर कराव्यात.

सरपंच/सचिव
ग्रामपंचायत **अरोली**
पंचायत समिती मौदा